# प्रकरण २

## शिवाजी सावंत यांची वाङ्मय निर्मिती



पूर्व प्रकरणांमध्ये मराठी कथा वाङ्मयाच्या उगापासून ते सध्यकालीन परिस्थितीच्या दरम्यान मराठी कथा विश्वामध्ये कोण कोणती स्थित्यंतरी घडली, तसेच मराठी कथा विश्व समृद्‌ध करायला कोणी कोणी मोलाचे योगदान दिले. याचा आढावा घेतला गेला.

प्रस्तुत प्रकरणामध्ये शिवाजी सांवत यांच्या जन्मापासून ते अखेर पर्यंतच्या जीवन प्रवासाचा, त्यांनी प्रकाशित केलेल्या त्यांच्या संपूर्ण वाङ्मयाच्या मागील भूमिकेचा, त्यांना लाभलेल्या वेगवेगळ्या पुरस्कारांचा, सन्मानांचा अभ्यास विषयांच्या अनुषंगाने आढावा घ्यावयाचा आहे.

# ○ शिवाजी सावंत यांचा व्यक्तीपरिचय ○

'मृत्युंजय' ही कादंबरी लिहून साहित्य विश्वात स्वत:चे वेगळे व अढळ स्थान निर्माण करणाऱ्या शिवाजी सावंत यांचा वाङमयीन प्रवास केवळ तीन तपांचा आहे. यामध्ये त्यांनी 'मृत्युंजय, छावा, युगंधर' ह्या सारख्या मराठी साहित्य विश्वात साहित्यबंध म्हणून गणली जातील अशा अजरामर कलाकृतीची निर्मिती केली असून मराठी साहित्य विश्वाला जगाच्या नकाशावर नेण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्या ह्या अजरामर कलाकृतींची लोकप्रियता सुद्धा कायम आहे. एवढे प्रचंड यश या कादबऱ्यांना लाभले.

'मृत्युजंय' कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व भारतीय ज्ञानपीठाचा मुर्तीदेवी पुरस्कार प्राप्त करणाऱ्या शिवाजी सावंत यांच्या संपूर्ण वाङमयाचा परिचय करुन घेत असताना त्यांच्या वैयक्तिक जीवन प्रवाहाचा वेध घेणे सुद्धा उद्‌बोधक ठरेल.

प्रत्येक माणसाचे व्यक्तिमत्व अंर्तबाह्य अशा दोन अंगाने युक्त असते. त्यातील बाह्यांग माणूस म्हणून दृष्टिगोचर असते. तर अंतरंग माणूसपणाचे अनेक व वैचित्र्यपूर्ण पैलुंची प्रसंगानुरुप साक्ष देते. व्यक्ती जर साहित्यिक असेल तर ते पैलू स्पष्टपणे समजून घेण्याला चांगले असते. कारण साहित्य प्रकाराचा विषय, आशय, शैली, भाष्य, व्यक्तिरेखा इ. च्या निवडीतून व अभिव्यक्तीतून, त्यामागील चिंतनातून साहित्यिकाचे व्यक्तिमत्व आकळत जाते. त्या दृष्टिने शिवाजी सांवतांचे जीवन एक श्रेष्ठ-जेष्ठ साहित्यिक म्हणून समजून घेणे प्रत्येक वेळी वेगळा आनंद व वेगळी जाण देणारे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील 'आजरा' या तालुक्याच्या गावी एक मध्यम वर्गीय शेतकरी कुटुंबामध्ये '३१ ऑगस्ट १९४०' रोजी शिवाजी सांवत यांचा जन्म झाला त्यांचे संपूर्ण नाव श्री. शिवाजी गोविंदराव सांवत. त्यांच्या वडिलांचा शोभेची दारु तयार करण्याचा व्यवसाय होता. परिस्थिती मात्र बेताची होती. त्यातच श्री. शिवाजी सांवतांच्या वयाच्या दहाव्या वर्षी त्यांच्या वडिलांचे निधन झाले. संपूर्ण सावंत कुटुबियांच्या डोक्यावरचे छत्रच हरवून गेले. मात्र सावतांचे वडील बंधू विश्वास सावंत यांनी घराची जबाबदारी पेलली.

कोणत्याही कलावंताचे व्यक्तिमत्व हे अनेक घटना, प्रसंग अपघात स्थळ परिसर यांच्या एकत्रित परिणामातून साकार झालेले दिसते. शिवाजी सांवत यांच्या जीवनावर सुद्धा अशाच काही घटना, प्रसंग, व्यक्ती यांचा प्रभाव पडून त्याचे वाङमयीन व्यक्तिमत्त्व व जीवन समृद्ध झालेले दिसते.

शिवाजी सांवत यांचा जन्म ज्या 'आजरा' या गावात झाला ते गाव हिरण्यकेशी व चित्रा या नद्यांच्या संगमावर वसले असून आकारमानाने जरी हे गाव छोटे असले तरी निसर्गरम्य अशा थंड व आल्हाददाय वातावरणात ते वसले आहे.[१] या गावच्या लाल मातीचा व ऐथल्या माणसांचा सावंतांच्या वर संस्कार झाला आहे. त्याच्या आयुष्याच्या सुरुवातीची काही वर्ष ह्याच गावात गेल्या कारणाने हुतूतू, खो-खो, विटी - दांडू, लगोरी, सूरूपारंब्या, आट्या पाट्या, कबड्डी या सारख्या खेळात त्यांना विशेष रस होता. मात्र या सर्वाहून त्यांना 'हिरण्यकेशी' नदीच्या रामतीर्थावरच्या कुंडात तासन तास पोहायला आवडत असे. याबद्दल सावंत लिहीतात ''आजऱ्या पासून सुमारे दीड एक मैलावर रामतीर्थ नयन मनोहर स्थान आहे. हिरव्या केशीच्या पात्र प्रवाहाचा दहा-वीस हात खोलचा असलेला धबधबा तेथे अखंड कोसळत असतो. कुठल्या अनादी युगातला आहे कोणास ठाऊक पण काळीशार झिलई असलेले हत्तींच्या माटांचे प्रचंड कातळ तेथे मुक्त पसरले आहे. रामतीर्थवर जाऊन गर्जत कोसळणाऱ्या फेसाळत्या धबधब्यात उड्या घालणं हा माझा लाडका छंद आहे.[२]'' या वरुन असे लक्षात येते की, शिवाजी सांवतांच्या जडण घडणीत निसर्ग सुंदर पर्यावरणाचा वाटा निश्चितच मोठा आहे.

घरची परिस्थिती बेताची असल्याकारणाने सावंतांना फार शिक्षण घेता आले नाही. मात्र जो काही शैक्षणिक प्रवास घडला. त्यामध्ये त्यांना अनेक ज्ञानसंपन्न गुरुवर्यांचा सहवास मात्र लाभला. याच विद्यार्थी दशेमध्ये त्यांना आपल्या जवळच्या प्रतिभेच्या दैवी देणगीचा प्रत्यय आणणारी घटना घडली. शिवाजी सांवत त्या वेळी आठवीच्या वर्गात शिकत होते. त्यावेळी त्यांनी लिहिलेला 'माझे ध्येय' हा निबंध त्यांचे वर्ग शिक्षक व.वा. जोशी यांना अतिशय आवडला व तो त्यांनी मैट्रिकच्या मुलांच्या समोर वाचला. संपूर्ण विद्यालयाची शाब्बासकी सावंतांना मिळाली. आपण लिहीले व बोलले, तर लोकांना आवडते असा आत्मविश्वास या वयात त्यांना आला व त्या वेळीच त्यांनी लेखक व्हावयाचे निश्चित केले. तेव्हा त्यांचे वय केवळ १४ वर्ष होते.

धडपड्या स्वभावाच्या शिवाजी सांवतांना लहानपणापासून व्यायाम, पोहणे, व्हॉलीबॉल या सारखे छंद होते. त्याच बरोबर त्यांना वाचनाची देखील खूप आवड होती. वाचनाची भूक त्यांनी आजऱ्याच्याच 'श्री गंगामाई वाचन मंदिरात' पूर्ण करुन घेतली. हे वाचनालय इंचलकरंजीकर संस्थानचे अधिपती घोरपडे सरकार यांनी सुरु केले होते. या सोबत शिवाजी सांवतांना अभिनयाची सुद्धा आवड होती. १९५८ साली मैट्रिकला असताना शिवाजी सांवतांनी व्यकंटराव हायस्कूल या शाळेने बसविलेल्या डॉ. कैलास या नाटकामध्ये कैलासची भूमिका छान केली होती.[३] याच छंदातून त्यांनी 'मृत्युंजय, छावा' या सारख्या अजरामर नाटकांची निर्मिती केली असावी.

१९५८ साली शिवाजी सांवत व्यकंटराव हायस्कूल मधून मैट्रिक पास होऊन बाहेर पडले व पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरला आले. घरच्या परिस्थितीला हातभार लावता यावा म्हणून त्यांनी नोकरी करत शॉर्ट हॅन्ड आणि टंकलेखनाचा डिप्लोमा पूर्ण केला. ते वर्ष होते १९६० त्या वर्षी संपूर्ण जिल्ह्यातून शॉर्ट हॅन्ड पास होणारे ते एकमेव विदयार्थी होते. त्यामुळे कोल्हापूरच्या वरिष्ठ सत्र न्यायालयात त्यांना लागलीच नोकरी मिळाली. मात्र अध्यापन कार्य हे त्यांचे स्वप्न होते व लेखक बनणे हे त्यांचे ध्येय व दोन्ही गोष्टी ह्या नोकरीत त्यांना साध्य होण्यासारख्या नव्हत्या. म्हणून अखेरीस दीडवर्षांनी त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला व त्याचवर्षी म्हणजे ऑक्टोबर १९६२ मध्ये कोल्हापूरच्या मल्टीपरपज शिक्षण देणाऱ्या राजाराम हायस्कूलमध्ये त्यांना रुजू होण्याची संधी मिळाली. ही नोकरी त्यांनी १९७४ साला पर्यंत म्हणजे साधारण १४ वर्ष केली. त्यांचा मूळचा पिंड हा कलाकाराचा असल्या कारणाने या काळात त्यांनी कोल्हापूरातील अनेक कलावंतांशी सातत्याने संपर्क ठेवला. याच दरम्यान बाहेरुनच अभ्यास करुन ते पुणे विद्यापीठाची एफ. वाय. बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

या नंतरची त्यांची जवळ जवळ १६ वर्ष त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारीच ठरली. कारण याच वेळी त्यांनी 'कर्ण' जीवनावर 'मृत्युंजय' नावाची दीर्घ कांदबरी लिहिण्याचा मनोदय केला.

## शिवाजी सावंत यांच्यावर घडलेला साहित्य संस्कार

काही व्यक्तींच्या आयुष्यामध्ये अशा काही घटना, प्रसंग घडतात की, त्यांचा अतिशय खोलवर परिणाम त्या व्यक्तीच्या संपूर्ण जिवनावर आणि व्यक्तिमत्वावर पडतो व त्यातूनच त्या व्यक्तीच्या भावी आयुष्याच्या कार्य कर्तुत्वाचा दिशा निश्चित होते. असेच काही प्रसंग शिवाजी सावंत यांच्या आयुष्यात घडलेले दिसतात.

विद्यार्थी दशेमध्ये असताना शिवाजी सावंतांच्या जीवनात सुद्धा एक अशीच घटना घडली ते शिकत असलेल्या व्यकंटराव हायस्कूल मध्ये प्रत्येक वर्षी स्नेहसंमेलन साजरे केले जात होते. एके वर्षीच्या स्नेह संमेलनासाठी 'महाराष्ट्र राज्य भाषा सभेचे' 'श्री. गो.प. नेने' हजर राहणार होते. या स्नेह संमेलनाचे नाटिका हे प्रमुख आकर्षण होते. शिवाजी सावंत स्वभावताच नाटक वेडे होते. त्यामुळे त्यांनी आपल्या मित्रमंडळींना जमवुन 'शि.म. परांजपे' लिखित 'अंगराज कर्ण' ही एकांकिका बसवायला घेतली. गोरापानरंग, सुडौल बांधा, व स्पष्ट शब्दोच्चार यांमुळे शिवाजी सावंतांच्याकडे त्या नाटकातील श्रीकृष्णाची भूमिका करण्याची जबाबदारी आली. ठरल्याप्रमाणे त्यांना ही भूमिका अतिशय उठावदारपणे

करुन सर्वांना खूश केले. मात्र सावंत आतल्या आत बैचैन व्हावयास लागले होते. कारण श्रीकृष्णापेक्षा कर्णाने फेकलेले संवाद त्यांना अस्वस्थ करीत होते. कारण ते तर्कशुद्ध व बिनतोड होते. रथचक्र उद्धरणाच्या प्रसंगीचे कर्णाचे शब्द त्यांच्या मनात नकळत एखाद्या बाणासारखे रुतून बसले होते आणि हाच त्यांच्यावर घडलेला पहिला साहित्य संस्कार होता.

मैट्रिक पास झाल्यानंतर शिवाजी सावंत कोल्हापूरात आले. आपल्या नोकरीचा व्याप संभाळित त्यांनी पुणे विद्यापीठामध्ये एफ.वाय बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. या परिक्षेच्या अभ्यासामध्ये त्यांना हिंदीतील प्रसिद्ध 'कवी प्रभात' उर्फ 'श्री. केदारनाथ मिश्रा' (पाटणा) यांचे 'कर्ण' हे रससंपन्न खडकाव्य अभ्यासायला लागले. शालेय जीवनात कर्णाच्या व्यक्तिमत्वाचा त्यांच्या मनावर संस्कार झाला होताच तोच संस्कार अतिशय पिळदार स्वरुपात त्यांच्या सृजनशीलता कलावंत मनावर पुन्हा उमटला. परिणामी ते खडकाव्य त्यांनी शब्दश: पाठच करुन टाकले. हेच मृत्युंजयच्या निर्मितीचे खरे बीज होते. ह्या बीजाला त्यांनी पुढील सोळा वर्ष परिश्रमाचे अभ्यासाचे खतपाणी घातले. वयाच्या १४ व्या वर्षी लेखक बनण्याच्या ध्येयाच्या पार्श्वभूमीवर ह्या बीजाला वटवृक्षाचे स्वरुप दिले. आणि 'मृत्युंजय' कार शिवाजी सावंत असा बहुमान त्यांनी प्राप्त केला.

## लेखकीय मनोभूमी आणि मृत्युंजय निर्मितीची पार्श्वभूमी

'मृत्युंजय' या कादंबरीच्या निर्मितीसाठी ज्या वाचनाची आवश्यकता होती. ती त्यांनी 'करवीरनगर वाचनालय व गोखले कॉलेजच्या ग्रंथालयात' बसून पूर्ण केली. तसेच कांदबंरी अधिक वास्तवादी होण्यासाठी केवळ कल्पनेच्या नौकेतून प्रवास करुन चालणार नाही. तर त्यासाठी कुरुक्षेत्राच्या भूमीवर सुद्धा प्रवास करायला हवा. याद्दष्टिने शिवाजी सावंतांनी कुरुक्षेत्राच्या प्रवासाचा बेत आखला. मात्र नोकरीतील रजेची अडचण व आर्थिक परिस्थिती ह्या दोन्ही अडचणी त्यांच्या समोर होत्या. परंतु मनात आलेला विचार पूर्ततेच्या टोकाला लावण्यासाठी काहीही करण्याची जबरदस्त इच्छा शक्ती त्यांच्या ठायी होती. त्यांच्या या जिद्दी स्वभावाला बघून करवीर मधील काही साहित्य प्रेमींनी सावंतांना आर्थिक मदत देऊ केली. परिणामी त्यांचा आर्थिक प्रश्न निकाली निघाला. मात्र रजेच्या प्रश्नाचे काय ? अशा वेळी 'डॉ. पाथरकर' धावून आले. त्यांनी शिवाजी सावंतांना दोन महिने आजारी पाडले (कागदोपत्री) व त्यांचा रेजचा प्रश्न ही हाता वेगळा झाला.

यानंतर सावंतांनी कुरुक्षेत्राच्या प्रवासाला सुरुवात केली. शोधा कडून बोधाकडे असणाऱ्या या प्रवासामध्ये त्यांच्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मधुकरराव चौधरी, प्रबोधनकार ठाकरे, यांच्या भेटी

झाल्या. त्याच बरोबर ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी 'दिनकर' यांचा भेटीचा सुद्धा योग आला. भारतीय सेंट्रल लायब्ररीचे प्रमुख श्री. एम. एम. देशपांडे. संघाचे संचालक गोळवलकर गुरुजी या सारख्या प्रभुतींशी प्रदीर्घ चर्चा करण्याचा सुवर्ण योग आला. प्रत्यक्ष कुरुक्षेत्रावर त्यांनी एक महिना मुक्काम केला. या मुक्कामामध्ये त्यांनी कुरुक्षेत्रावरील प्रमुख ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. उपलब्ध संदर्भ तसेच लोककथांचे संदर्भ तपासले. जाणत्या बुजुर्गांच्या मुलाखती देखील घेतल्या.

या सर्व ज्ञान भांडाराचा संग्रह घेऊन शिवाजी सावंत तब्बल दोन महिन्याच्या प्रवासानंतर कोल्हापूरात परतले आणि मृत्युंजयच्या उर्वरीत लिखाणाला सुरुवात झाली. बघता बघता मृत्युंजय परिपूर्ण झाली. परंतु प्रश्न होता. मृत्युंजय प्रकाशित करण्याचा कारण सावंत प्रकाशकांच्या दृष्टीने नवोदीत साहित्यिकांच्या मध्ये मोडणारे असल्याने त्यांचे १५०० पानांचे हस्तलिखिताचे बाड कुणीही स्वीकारायला तयार नव्हते. अर्थात त्यांचे हे न स्वीकारणेच सावंतांच्या उज्ज्वल यशाची सूचना देत होते. कारण कोणतेही काम स्वीकारल्या नंतर ते तडीस लावणे हा सावंतांचा धर्म होता. शिवाजी सावंतांचे साहित्य विश्वातील पहिले पाऊल म्हणजे 'मृत्युंजय' ही कांदबरी त्यामुळे ह्या वेळेपर्यंत सावंतांचा साहित्य क्षेत्रातील व्यक्तींशी फारसा किंबहुना संपर्कच नसावा. त्यामुळे त्यांची १५०० पानांची कांदबरी प्रकाशित करणे काही प्रकाशकांना जमणारे अथवा पेलणारे नसावे सरते शेवटी सावंतांनी त्यांचे मित्र आर.के. कुलकर्णी यांच्या सहाय्याने पुण्यामध्ये ग. दि. माडगूळकरांशी संपर्क साधला व मृत्युंजय हस्तलिखित त्यांच्या हवाली केले ते हस्तलिखित वाचल्यानंतर ग.दि.मांडगूळकरांनी कॉन्टिनेंटल प्रकाशन संस्थेचे श्री. अनंतराव कुलकर्णी यांच्याशी फोन वर संपर्क साधला फोनवर ते स्पष्ट बोलले. ''आमच्या कोल्हापूरातील एका मैतरानं हे जंगी लिव्हलंय, कादंबरी हाय पोरगी नाकी डोळी नीटस असेल तर कॉन्टिनेंटलकडे सोयरीक करायला हरकत नाही ![४] ग.दि. मांच्या मध्यास्थित जमलेल्या या सोयरिकेचे रुपांतर १९६७ सालच्या गणेश चतुर्थीला 'मृत्युंजय' चे साध्या घरगुती पद्धतीने पूजन व प्रकाशन समारंभात झाले.

बघता बघता मृत्युंजयच्या यशाचा वारु चौफेर उधळला. मृत्युंजय लोकांनी उचलून धरली. तीन हजारांची पहिली आवृत्ती आवघ्या साडेतीन महिन्यात संपली. मान्यता आणि लोकप्रियता या दोन्ही कसोट्यावर ती यशस्वी ठरली होती. तिला अनेक पुरस्कार लाभले.

## शिवाजी सावंत यांचे वैवाहिक जीवन

याच काळात शिवाजी सावंत यांच्या खाजगी जीवनाचा ताबा घेणारी एक घटना घडली. मृत्युंजयच्या अतुलनीय यशा बदद्ल सावंतांना अभिनंदन करणारी अनेक पत्रे येत होती. त्यातील एक

पत्र पुण्याच्या कु. कुंदा कामतेकर ह्यांचे होते. सावंतांनी त्या पत्राला उत्तरही पाठविले यानंतर कामतेकरांचे दुसरे पत्र आले या पत्राच्या शेवटी त्यांनी लिहीले होते. आपल्या लेटर हेडवरील मानचिन्हावरुन जाणवले. आपण तेजाचे पुजक आहात ह्या एकाच विधानावरुन सावंतांनी ही मुलगी आपली जीवनसाथी होण्यास सर्वथा योग्य असल्याचा निर्णय घेतला.

९ जून १९६९ या दिवशी कोल्हापूरला मुक्कामी सावंत चर्तुभुज झाले त्या पुढच्या वर्षी म्हणजे १९७० साली सावंत दांम्पत्याला 'कादंबिनी' नावाचे कन्या रत्न झाले व त्याच वर्षी सावंतांनी 'युगंधर' या संकल्पित कादंबरीसाठी वाचन, चिंतन सुरु केले. बंकिमचंद्राच्या श्रीकृष्ण - चरित्राचा अभ्यास देखील त्यासाठी त्यांनी केला. या नंतर अवघ्या दोन वर्षांनी म्हणजे १२ जानेवारी १९७२ रोजी 'अमिताभ' ह्या त्यांच्या मुलाचा जन्म झाला. त्याचवर्षी सावंतांनी 'छावा' या संभाजी महाराजांच्या जीवना वरील कांदबरी लेखनास प्रारंभ केला. या काळात पुण्यातील साहित्यिकांशी सावंत यांचा परिचय झाला. परिचयाचे रुपांतर स्नेहात झाले. साहजिकच शिक्षक असून साहित्य विश्वात स्थिरावलेल्या सावंतांना पुण्या बद्दल ओढ वाटु लागली व पुण्यात स्थिरावण्यची त्यांची धडपड सुरु झाली. त्यांना तशी सुसंधी चालून आली. सावंतांचे मित्र 'जयराम देसाई' यांच्या सहकार्याने १९७४ साली सावंतांना राज्य शासनाच्या शिक्षण खात्याच्या 'लोकशिक्षण' या मासिकाचे संपादन करण्याची जबाबदारी मिळाली व याचाच उपयोग करीत ते पुण्यात स्थायिक झाले. हे संपादनाचे कार्य त्यांनी १९८६ सालापर्यंत केले व त्या नंतर स्वेच्छा निवृत्ती पत्करली. या सहावर्षाच्या कालावधीत सावंतांना डॉ. पद्मश्री चित्राताई नाईक या थोर शिक्षण तज्ञाचा सहवास लाभला. याच वेळी 'छावा' चे लेखन चरणीसीमेवर होते. नेमका याच वेळी सावंतांचा अपघात झाला. हॉस्पिटल मध्ये ॲडमिट होण्याची गरज होती. तरी ही आपल्या जिद्दी स्वभाव ह्याही वेळी सोडला नाही आणि घरी रावूनच त्यांनी 'छावा' या कांदबरीचे लेखन पूर्ण केले. तद्नंतर त्यांना जसलोक हॉस्पिटल मध्ये ॲडमिट करण्यात आले याच दरम्यान सावंतांच्या मनावर आघात करणारी एक घटना घडली. त्यांच्या मातोश्री राधाबाई सांवत ह्या अनंतात विलीन झाल्या. शिवाजी सावंत हे घरात सर्वात लहान होते. त्यामुळे त्यांच्या मातोश्रींचे आपल्या शेंडेफळावर फार प्रेम होते. त्या स्वभावाने धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्यामुळे सावंतांच्या मनावर आपल्या आईच्या धार्मिक स्वभावाचा नकळत परिणाम झाला असावा व त्यातूनच सावंतांना धार्मिक, पौराणिक कथा, गोष्टींचे आकर्षण निर्माण झाले असावे व त्यातूनच त्यांनी पौराणिक, ऐतिहासिक कलाकृतींची निर्मिती केली असावी.

या दु:खातून सावरत असताना प्रथितयश व अभिजात रंगकर्मी, चंद्रलेखा ह्या नाट्यसंस्थेचे संस्थापक चालक 'मोहन वाघ' यांनी सावंतांना आपल्या 'मृत्युंजय' या कादंबरी वरुन नाटक लिहिण्याची विनंती केली. त्यांच्या विनंती खातर सावंतांनी 'मृत्युंजय' नावाचे नाटक लिहिले हे नाटक १९ डिसेंबर १९७६ रोजी चंद्रलेखा मार्फत प्रथम रंगभूमीवर सादर झाले.

१९७९ साली शिवाजी सावंत यांनी शिवपुत्र संभाजीच्या संपूर्ण आयुष्याची कथा चित्रण करणारी 'छावा' नावाची दुसरी कांदबरी प्रकाशित केली. या कादंबरीला सुद्‌धा अमाप लोकप्रियता लाभली. त्यानंतर सावंतांनी आपल्या या कादंबरी वरुन 'छावा' नावाचे दुसरे नाटक निर्माण केले. ते सुद्‌धा मोहन वाघ यांनीच मोठ्या धुमधडाक्यात रंगभूमीवर आणले.

सहकार आणि कामगार हे शिवाजी सावंत यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे विषय: ह्या जिव्हाळ्यातूनच त्यांनी आशिया खंडात शेतकऱ्यांचा पहिला साखर कारखाना उभा करणाऱ्या कै. डॉ. पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या जीवनावर 'लढत' नावाची व्दिखंडात्मक चरित्र कहाणी लिहीली. तसेच कामगार नेते 'भाई मनोहर कोतवाल' यांच्या जीवनावर 'संघर्ष' ही प्रदीर्घ चरित्र - कहाणी त्यांनी पूर्ण केली. १९९० साली शिवाजी सावंत यांनी 'युगंधर' या श्रीकृष्णाच्या जीवनावरील महाकादंबरीच्या लेखनास प्रारंभ केला. त्यासाठी त्यांनी श्रीकृष्णाची जन्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मथुरा, व्दारका व श्रीकृष्णाने ज्या ठिकाणी शिक्षण घेतले. त्या सांदपनी ऋषींच्या अंकपाद आश्रमाला सुद्‌धा भेट दिली. तसेच वाचन, मनन, चिंतन व संदर्भ, शोध देखील अखंड चालू केला.

## शिवाजी सावंत यांनी जोपासलेली सामाजिक बांधिलकी

शिवाजी सावंत हे केवळ साहित्यिकच नव्हते तर सामाजिक बांधिलकी मानणारे ते एक सुजाण नागरिक होते. साहित्य व समाज यांचे एक अतूट नाते असते व याचे चांगलेच भान त्यांना असल्याचा प्रत्यय त्यांनी घेतलेल्या काही निर्णयावरुन व प्रसंगावरुन लक्षात येते.

सावंतांची कन्या कु. कांदबिनी हिचा विवाह ठरला हा क्षण सावंतांच्या परिवाराच्या दृष्टिने अत्यंत आनंदाचा होता. मात्र याच वेळी केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्या माणुसकीला हळहळ व्यक्त करायला लागणारी घटना घडली. मध्यरात्रीच्या वेळी भूकंप झाला व त्यामध्ये हजारो लोकांना काळ झोप लागली. कित्येकांचे संसार उध्वस्त झाले. हसत खेळत असणारी किल्लारी, लातूर मधील गावे जमीन दोस्त झाली. जगातून माणुसकीचे दर्शन घडून आले. मदत येऊ लागली सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या व माणसावर प्रेम असणाऱ्या सावंतांना घडलेल्या परिस्थितीची जाण आली. भाई

कोतवाल यांनी नोंदणी पद्धतीने विबाह करुन लग्नाच्या वायफळ खर्चाला पूर्णपणे बगल दिली होती. ही गोष्ट कामगार बंधुंनी लक्षात घेतली पाहिजे. असा सल्ला 'संघर्ष' या चरित्र कहाणीत देणाऱ्या सावंतांनी हा सल्ला स्वत: आचरणात आणला व मुलांकडच्या मंडळींना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून दिले व आपल्या कन्येच विवाह अत्यंत साध्या पद्धतीने करुन त्यातून वाचविलेले ५०,०००/- रुपये सावंतांनी किल्लारी भुकंपग्रस्तांच्या मदतीला दिले आणि त्यातून दोन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली.

साहित्य हे समाज प्रबोधनाचे महत्वपूर्ण साधन आहे. असा दृढ विश्वास असणाऱ्या सांवतांनी 'महाराष्ट्र साहित्य परिषदेला' सुद्धा एक लाखाची देणगी दिली. या रक्कमेच्या येणाऱ्या व्याजामधून मराठी मध्ये निर्माण होणाऱ्या प्रत्येक वर्षी उत्कृष्ट कलाकृतीचा गौरव करण्यात येतो. यातून शिवाजी सावंत यांनी दोन गोष्टी साध्य केल्या आहेत. एक म्हणजे मराठी साहित्य विश्वावर त्यांचे जे प्रेम होते. ते प्रेम त्यांनी व्यक्त केले आहे. तसेच नावोदित साहित्यिकांना साहित्य निर्मितीसाठी प्रोत्साहन मिळावे. हा देखील उद्देश त्या मागे असावा.

## शिवाजी सावंत यांना लाभलेला मूर्तिदेवी पुरस्कार

शिवाजी सावंत यांनी वयाच्या केवळ २७ व्या वर्षी लिहिलेली 'मृत्युंजय' ही कादंबरी या कादंबरीने दरम्यानच्या काळात अनेक मान सन्मान मिळविले. पुरस्कार मिळविले. वेगवेगळ्या भाषांमध्ये तिचे भाषांतर झाले. मात्र या सर्वापेक्षा सगळ्यात मोठा पुरस्कार मृत्युंजयला मिळाला तो म्हणजे भारतीय ज्ञानपीठाचा 'मूर्तिदेवी पुरस्कार'

राष्ट्रपती के. आर. नारायण, पंतप्रधान अटलबिहाणी वाजपेयी यांच्या उपस्थितीत ६ फेब्रुवारी १९९६ रोजी दिल्ली येथे शिवाजी सावंतांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा दिवस केवळ सावंतांना अभिमान वाटावा असा नव्हता तर अवघ्या महाराष्ट्राला अभिमान वाटावा असा होता.

या पुरस्कारामुळे शिवाजी सावंतानी मराठी साहित्य विश्वाला केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या नकाशावर नेण्याचे काम केले. त्या नंतरच्या काळात सावंतांना अनेक पुरस्कार लाभलेले दिसतात.

या शिवाय सावंत यांनी अशी मने असे नमुने व मोरावळा नावाची दोन व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकांची निर्मिती केली. तसेच 'शेलकासाज' 'कांचनकण' नावाचे दोन ललित लेख संग्रह सुद्धा त्यांनी यशस्वी केले. त्याच सोबत युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन नावाचे वैचारिक पुस्तक 'क्रातिसिंहाची गावरान बोली' नावाचे संपादित पुस्तक व 'श्री साई - गीत' नावाचा गीत संग्रह सुद्धा प्रसिद्ध झाला.

मार्च १९९९ साली सावंतांनी 'युगंधर' ही कादंबरी लिहून पूर्ण केली २० वर्षाच्या प्रदीर्घ परिश्रमाचे हे परिपाक होते. २५ जुलै २००० साली श्री कृष्णाच्या चक्रवर्ती जीवनावरील एक हजार पृष्ठांची ही महाकांदबरी कॉन्टिनेंटल प्रकाशन संस्थेमध्ये हरिव्दारचे रामकृष्ण मठाचे स्वामी अकामानंद महाराज यांच्या हस्ते पुजन करुन वितरीत करण्यात आली. ही कांदबरी प्रकाशित करण्यापूर्वीच भारतीय ज्ञानपीठाने तिचे हिंदी प्रकाशन स्विकारले होते व शिवाजी सावंतांच्या पत्नी सौ. मृणालिनी सावंत यांच्यावर 'युगंधर' या कादंबरी च्या हिंदी करणाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. या कादंबरीचे लेखन चालू असताना सावंतांना मधुमेहा सारखा आयुष्यभर साथ देणारी व्याधी जडली. त्यातच त्यांना हृदय विकाराचा तीव्र झटका आला. मात्र कोणत्याही परिस्थितीत कितीही अडचणी आल्या तरी हाती घेतलेले काम तडीस लावण्याच्या त्यांच्या जिदूदी स्वभावाची साक्ष त्यांनी ह्या वेळी ही दिली आणि 'युगंधर' पूर्ण झाली. ह्या कादंबरीचे लेखन चालू असताना जयराम देसाई ह्या सावंतांच्या जिवलग मित्राच्या प्रयत्नातून त्यांना भारत सरकारच्या मानव संशाधन व सांस्कृतिक कार्यालयाच्या वतीने 'एक लाख वीस हजार' रुपयांची जेष्ठ साहित्यिक शिष्यवृत्ती सुदूधा प्रदान करण्यात आली.

'युगंधर' ला सुदूधा वाचकांचा अमाप प्रतिसाद लाभला असून आजपर्यंत तिच्या चार आवृत्तया प्रकाशित झाल्या आहेत. यातच तिची लोकप्रियता लक्षात येते.

साहित्याचा एवढा सारा प्रपंच संभाळीत असताना शिवाजी सावंतांनी आपल्या अमोघ वाणीने संपूर्ण महाराष्ट्राला जिंकले. श्रीराम, श्रीकृष्ण, छ. शिवाजी महाराज, संभाजी महाराज हे त्यांचे भाषणाचे व अभ्यासाचे विषय होते. तसेच साहित्य व सद्यःस्थिती या बदूदली त्यांचे विचार श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत असत. ओघवती व प्रभावी भाषाशैली विषयाची नेटकी मांडणी व सांगोपांग माहिती आणि धारदार आवाज यामुळे श्रोत्यांचे मने ते लिलया आपल्या भोवती गुंतवून ठेवत. या वैशिष्ट्यामुळेच त्यांना केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या थोर राजकरणी, विचारवंत यांच्या बरोबर व्यासपीठावर वावरण्याचे भाग्य लाभले.

साहित्य प्रांतात आपल्या साहित्याव्दारे मानदंड निर्माण करणाऱ्या शिवाजी सावंत यांनी २००२ साली आपल्या वयाची साठी पूर्ण केली. हे औचित्य साधून त्यांच्या चाहत्यांनी त्यांची एकसष्टी समारोह पुणे येथील 'बालगंधर्व रंगमंदिर' मध्ये ३० डिसेंबर २००२ रोजी 'प्राचार्य शिवाजीराव भोसले' यांच्या शुभहस्ते व जेष्ठ साहित्यिक भा.द.खेर यांच्या अध्यक्षते खाली संपन्न केला.

## शिवाजी सावंत यांचा संकल्पित कलाकृतींसाठी अभ्यास – शोध प्रवास

यानंतरच्या काळात शिवाजी सावंतांनी भावी लिखाणाचा साचा हळूहळू तयार केला होता. त्यासाठी आवश्यक त्या संदर्भाचा शोध व अभ्यास प्रवास देखील त्यांनी सुरु केला. या नियोजित लिखाणामध्ये त्यांनी स्वत:चे आत्मचरित्र लेखनाचा सुद्‌धा मनोदय व्यक्त केला होता. 'माझे आकाशे माझी जमीन' हे शीर्षक सुद्‌धा त्यांनी त्यासाठी निश्चित केले होते. त्याच सोबत राजर्षी शाहू महाराज, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या तीन विभूतींच्या कार्य कर्तृत्वाचा आलेख मांडणारी 'त्रिदल' नावाची चरित्रात्मक कादंबरी सुद्‌धा त्यांनी लिखाणाचे योजलेले होते. त्याच सोबत विवेकानंदांचे गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या वर चरित्र वजा लिखाण सुद्‌धा त्यांच्या संकल्पित साहित्यात होते. या सर्व कलाकृतींना पूर्ण करण्यासाठी ज्यावेळी त्यांनी प्रवास, शोध सुरु केला. त्या प्रवासात त्यांना आण्णासाहेब उर्फ पी. के. पाटील यांच्या प्रचंड विस्तारलेल्या कार्याचा परिचय अगदी जवळुन झाला आणि सावंतांनी आण्णासाहेबांच्या जीवनावर व कार्यावर आधारित 'पुरुषोत्तमनामा' ची घोषणा केली. त्यासाठी लागणाऱ्या मुलाखती, कागदपत्र, जुळविण्याच्या कार्यात सांवत गढून गेले. केवळ सहा महिन्यात त्यांनी ही चरित्र कहाणी पूर्ण केली व पुस्तकाची कच्ची प्रतही त्यांनी तयार करुन घेतली आणि येऊ घातलेल्या संम्मेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर या पुस्तकाचे प्रकाशन करण्याचे नियोजन केले.

या वरुन असे स्पष्ट होते की, शिवाजी सावंत आपली साहित्य कृती साकार करण्यापूर्वी अभ्यास, प्रवास व चिंतनाने स्वत:च्या सृजनशील मनोभूमीची मशागत करीत होते वास्तवाला भिडण्याचा त्यांचा असा प्रामाणिक प्रयत्न होता.

## ७६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा काळ –

याच वेळी 'कराड' येथे भरणाऱ्या ७६ व्या 'अखिल भारतीय' मराठी साहित्य संम्मेलनाचे बिगुल वाजले. शिवाजी सावंतांचा कित्येक वर्षाचा मनोदय ह्या वर्षी पूर्ण होण्याच्या मार्गावर होता. तो म्हणजे संम्मेलनाचे अध्यक्ष पद भूषविण्याचा अध्यक्ष पदाची निवडणूक जिंकायचीच असा निश्चय करुन त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला व प्रचाराच्या कार्याला लागले. त्यांच्या मित्रमंडळाची व असंख्य चाहत्यांची इच्छा शक्ती त्यांच्या पाठीमागे होती. खरे तर साहित्याच्या प्रांतात निवडणुक ही गोष्ट सावंतांना मान्यच नव्हती. परंतु काळाचा महिमा त्यांना तसे करायला लावत होता. मात्र ह्या निवडणुकीच्या क्षेत्रातही त्यांनी आपल्या मनाचा मोठेपणा सिद्‌धा केला होता. समोर उभ्या असलेल्या

अध्यक्षपदाच्या निवडीच्या स्पर्धामधील उमेदवाराचा कोणत्याही प्रकारे उपमर्द होऊ नये अशी ते स्वत: काळजी घेत होते व आपल्या कार्यकर्त्यांना सुद्धा त्या बद्दल सूचना देत होते. कारण समोर उभा असलेल्या उमेदवार हा शिवाजी सावंतांचा साहित्य प्रांतातील मित्र होता. माणसे मिळविण्याचे कसब असणाऱ्या शिवाजी सावंतांनी मिळालेली माणसे व त्यांची मैत्री टिकविण्यासाठी केलेले हे प्रयत्न होते. या निवडणुकीच्या काळात त्यांच्या मैत्रीत कोणत्याही प्रकारची कटूता येऊ नये याची ते काळजी घेत होते.

**अखेर –**

निवडणुकीच्या तयारीच्यादृष्टीने शिवाजी सावंतांनी प्रवास सुरु केला. मतदारांच्या भेटी सुरु केल्या. आपली भूमिका त्यांना समजावून सांगण्यास प्रारंभ केला. याच उद्देशाने ते गोव्यात गेले, पण ऐन युद्धाच्या वेळी रथचक्राने जसा कर्णाचा घात केला. त्याचप्रमाणे साहित्य क्षेत्रातील ही मानदंडाची लढाई जिंकण्यापूर्वीच मृत्युने मृत्युंजयकारांवर वार केला. १८ सप्टेंबर च्या सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने गोवा राज्यातील 'मडगाव' मध्ये मृत्युंजयकारांची प्राणजोत 'कृष्णरुप' झाली

गंगौध अव्याहत वाहात असताना 'प्रयाग' सारखी तीर्थक्षेत्र निर्माण करुन पुढे जातो. मात्र शिवाजी सावंतांचा साहित्य प्रवाह केवळ पस्तीस-चाळीस वर्षच वाहिला व यात सुद्धा त्याने 'मृत्युंजय', 'छावा', युगंधर सारखी पुण्यतीर्थ निर्माण करुन गेला.

**शिवाजी सांवत यांच्या वाङमयीन कलाकृती मागील भूमिका व त्याची थोडक्यात रुप वैशिष्ट्ये –**

१) **कादंबरी –**

१. मृत्युंजय - 'मृत्युंजय' हे शिवाजी सावंतांच्या आयुष्यातील साहित्य विश्वा मधील पहिले पाऊल होते. बघता बघता 'मृत्युंजय' लोकांनी उचलून धरली. मान्यता आणि लोकप्रियता या दोन्ही कसोट्यावर ती यशस्वी ठरली. वाचकांनी या कर्ण कथेचे सहर्ष स्वागतच केले. सामान्य शेतकरी स्तरातून आलेला व साहित्य - प्रतांत गरुड झेप घेणारा ग्रामीण भागातील उमदा लेखक अशी सावतांची ख्याती सर्वदूर पसरली [५] शिक्षकीपेशा मध्ये असणाऱ्या सावंतांना लेखनाचे धडे कोणाकडेही गिरविले नाहीत. तसेच परिस्थितीमुळे त्यांना आपले शिक्षण ही पूर्ण करता आले नाही. तरीही अफाट वाचन व पौराणिक ऐतिहासिक कथा, कादंबऱ्या वाचनाचा व्यासंग यातूनच त्यांनी रामायण, महाभारत यांचा सखोल अभ्यास केला. त्यातल्या व्यक्तिरेखा समजून घेण्यासाठी बरेच कष्ट केले. त्यातूनच त्यांनी दुर्लक्षलेली आणि दुर्दैवी ठरलेली कर्णाची व्यक्तिरेखा त्याच्या बऱ्यावाईट बाजुंसह कादंबरीत उभी केली.

भारतीय मनाला महाभारताचे विलक्षण आकर्षण त्या आकर्षणाची नस कर्णाचे चरित्र चित्रीत करताना सावंतांनी नेमकी पकडली. त्यामुळे 'मृत्युंजय' हे कर्णाचे आत्मचरित्रच ठरले[६] व्यक्तीच्या अंतरंगात इतिहासकार, चित्रकार यांना काही मर्यादाच्या पलिकडे जाता येत नाही. कादंबरीकाराला तेथे मुक्त प्रवेश असतो. हा अधिकार वापरुन सावंतांनी कर्णाच्या अंतरंगात प्रवेश केला आहे व बाह्यत: दिसणाऱ्या घडामोडी मागे विचार विकारांचे, वासनांचे, अहंभावाचे, मत्सराचे, प्रेमाचे केवढे कल्लोक असतात. हे दाखवून त्यांनी सूतपूत्र म्हणून दरवेळी हिणवल्या जाणाऱ्य कर्णाचे अंतरंग उलगडून दाखलविले आहे.

भारतीय पौराणिक साहित्य हे चमत्कारांनी व अद्‌भुतांनी भरलेले आहे. रामायण, महाभारत ही महाकाव्ये सुद्‌धा याला अपवाद नाही. मात्र या महाकाव्यांनी रसिकांच्या पिढ्यान पिढ्या मंत्रमुग्ध केल्या व प्रतिभावंताना विषयांचे खाद्य पुरवून त्यांच्या प्रतिभेपुढे आव्हांनाचे सातत्य ठेवले. शिवाजी सावंतांनी मात्र भारतातील अद्‌भुतांना व चमत्कारांना बुद्‌धि पुरस्सर बाजूला सारुन 'मृत्युंजय' मध्ये प्रसंगाना वास्तव रुप देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे वाचकांचे मन अतिमानवी सृष्टित न जाता नित्याच्या मानवी कार्यकारण बुद्‌ध जगातच वावरते. त्यामुळे मानवी जीवन हा मानवी प्रयत्न आणि नियती यांच्यातील अखंड संग्रामच आहे अशी प्रचिती येते.

इतिहास आणि पुराणाबद्‌दल आदर असणाऱ्या सावंतांनी लिहिले आहे. केवळ पौराणिक म्हणून महाभारत दूर ठेवता येणार नाही. मानवी स्वभावातील विविधता त्यात भरपूर आहे. अनेक पिढ्यांचा अनुभव त्यात गठित झाला आहे. त्यातील माणसांचा व त्यांचा स्वभावाचा शोध घ्यायला हवा.[७] असाच शोध सांवतांनी 'मृत्युंजय' मध्ये घेतला आहे. तो म्हणजे 'वृषाली' या व्यक्तिरेखेच्या आधारे. महाभारतातील अतिशय गौण व्यक्ती म्हणून वृषालीला मानले जाते. तिच्याकडे कोणाचे कधीच लक्ष गेलेले नाही. पण 'मृत्युंजय' मध्ये सांवतांनी तिला कर्णाची पत्नी, राणी व नायिका या तीनही रुपात प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली आहे. म्हणजेच शिवाजी सांवत यांनी 'मृत्युंजय' मध्ये अलक्षीत नायिका व उपेक्षित नायक यांची जोडी अमर केली आहे.

'मृत्युंजय' ही कादंबरी कर्ण या व्यक्तिरेखे भोवतीच फिरत असल्याकारणाने तिने कर्णाच्या व्यापक नि बहुमिती व्यक्तिमत्त्वाला यशस्वीपणे कवेत घेतले आहे. त्यामुळे कर्णाच्या अंतरंगात शिरुन कर्णाच्या जीवनातील घटना मागे कोणत्या मानसिक प्रेरणा व वेदना दडल्या होत्या. याचा शोध घेऊन त्या शब्दबद्‌ध करण्यात लेखक यशस्वी झालेला दिसतो. मूळ महाभारतांमध्ये कर्णाची उपस्थिती खंडीत स्वरुपात आहे. त्याचे अस्तित्व सातत्याने महाभारत कथानकाच्या व्यासपीठावर येत नाही. तरी ही

सावंतांनी कर्णाच्या व्यक्तिरेखेला नवे रुपदेत असताना तिच्यातील मूळ रंग फिके होऊन दिले नाहीत तर त्यातील स्वरुप नेमकेपणाने ओळखून ते अधिक गहिरे केलेले दिसतात.

'मृत्युंजय' मध्ये कर्णाच्या व्यक्तिरेखेचे पुर्नमुल्यांकन करीत असताना सावंतांनी कर्णाच्या व्यक्तिमत्वा मधील दोष, उणीवा आणि विकार वशता यांचे प्रकटीकरण तर केलेच आहे. त्याच सोबत त्यांची महत्ता सुद्धा अधोरिखित करुन कर्णाच्या व्यक्तिमत्वाला पूर्णपणे न्याय दिला आहे. या खेरीज त्यांनी 'मृत्युंजय' मध्ये कर्णाच्या आंतरिक व्यक्तिमत्वाचा शोध देखील घेतला आहे. महाभारतामध्ये कर्ण आपल्या 'उक्तीतून' व 'कृतीतून' साकार झाला आहे. कारण मूळ महाभारतामध्ये कर्ण ही व्यक्तिरेखा प्रधान व्यक्तिरेखांपैकी नसल्या कारणाने त्याच्या अंतरंगातील खळबळीचे चित्रण झाले नाही. नव्हे ते गृहितच धरले गेलेले नाही. कारण ते एक गौण व उपेक्षित पात्र होते. 'मृत्युंजय' मध्ये मात्र तो प्रधान व्यक्तिरेख म्हणून प्रकाश झोतात आणला गेला आणि तो बाह्यांगापेक्षा अंतरंगाने अतितरलतेने उलगडला गेला. त्यामुळे कर्ण कथेचा नव्या दृष्टिने घेतलेला सशक्त मागोवा असा 'मृत्युंजय' चा गौरव करण्यात आला.

'मृत्युंजय' या कादंबरी लेखना मागील शिवाजी सांवतांची भूमिका तटस्थ लेखकाची नसून लेखकाला भावलेल्या कर्णाच्या सहृदय सख्याची आहे. हे नाकारता येत नाही.

गेली चाळी वर्ष वाचकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या 'मृत्युंजय' या कादंबरीने आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळविले. इंग्रजी, कन्नड, गुजराती, मल्याळी या भाषांमध्ये तीचे रसाळ भाषांतर झाले असून या प्रत्येक भाषेमध्ये तिच्या दोन दोन आवृत्या निघाल्या आहेत. तर हिंदी मध्ये 'मृत्युंजय' च्या सोळा आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत. बंगाली भाषे मध्ये देखील तिचे भाषांतर झाले आहे. मराठी भाषेत तर तिच्या आजपर्यंत २५ आवृत्या प्रकाशित झाल्या असून तिची एक लाखावी प्रत ३१ ऑगस्ट २००६ रोजी प्रकाशित झाली. असा लक्ष वेध घेणारी श्यामची आई - साने गुरुजी, गड आला पण सिंह गेला ह.ना. आपटे या कादंबऱ्या नंतरची मराठीतील 'मृत्युंजय' ही केवळ तिसरी कादंबरी आहे. अशा या 'मृत्युंजयचे' नोबेल पुरस्कारासाठी कलकत्त्याहून नामांकन झाले असून ज्ञानपीठाच्या आजवरच्या इतिहासात 'मृत्युंजय' ने 'बेस्ट सेलर' म्हणून देखील आपले वेगळेपण जपले आहे.

## २) **'छावा'** –

'छावा' ही शिवाजी सांवत यांची दुसरी कादंबरी १९७९ साली प्रकाशित झाली. शिवपुत्र संभाजीच्या संपूर्ण आयुष्याचे चित्रण करणाऱ्या या कादंबरीचे प्रकाशन त्यावेळी 'स्व. यशवंतराव

चव्हाण' यांच्या हस्ते प्रतापगडावरील 'भवानी मातेच्या' मंदिरात अत्यंत साध्या प्रकारे पूजन करुन करण्यात आले.

बालपणा पासून संभाजी राजांना घडविण्याचा प्रयत्न शिवाजी महाराज व जिजाऊ आई साहेब करीत असतात. या शिवाय साधुसंत, मंत्री, नोकर, चाकर यांचा सुद्‌धा संस्कार शंभु राजांच्यावर होत असतो. संभाजी महाराज सोळा वर्षाचे होतात व त्यांच्या व्यक्तिमत्वात अभिषिक्त युवराजपणाच्या स्वतंत्र खुणा निर्माण होतात. त्यामुळे वडिलांच्या छत्राखाली राजकारणाचे धडे गिरविणे म्हणजे त्यांना अन्याय झाल्यासारखे वाटू लागते. त्यातच वडील आपल्याला समजून घेत नाहीत असा ग्रह त्यांच्या मनात निर्माण होतो. अनेक न उकलणाऱ्या प्रश्नांच्या गुंत्यात संभाजी राजे गुंतून पडतात. शिवाजी महाराज यावर उपाय म्हणून संभाजी राजांना संत सेवा करण्यासाठी सज्जनगडावर पाठवतात आणि ह्याच ठिकाणी पिता पुत्रांमध्ये संघर्षाची पहिली ठिणगी पडते. इथूनच पुढे कादंबरीच्या कथानकात वेग येतो.

शिवाजी सावंत यांची 'छावा' ही कादंबरी म्हणजे हरिभाऊ आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या, रणजित देसाई यांची 'स्वामी' ही कादंबरी ह्या नंतरच्या ऐतिहासिक कादंबरी विकासामधील एक महत्त्वाचा टप्पा आहे. असे सेतू माधवराव पगडी सारख्या सक्षेपी इतिहासकाराने नमुद केले आहे. याचाच अर्थ सावंतांची 'छावा' ही ऐतिहासिक कादंबरीचा मानंदड ठरते.

'छावा' ही कादंबरी प्रकाशित होईपर्यंत मराठीतील बहुतांश साहित्यिकांनी संभाजी राजांना कल्पित प्रिय पात्रांच्या गराड्यात इष्क बाजी करताना व लटके काव्यमय बोलताना दाखविले आहे. ह्या वर विचार होणे आवश्यक होते. 'छावा' या कादंबरीत सावंतांनी तो समर्थ पणे केला आहे. संभाजी महाराज हे केवळ राजे नसून ते कविमनाचे व अनेक संकटातून जात असताना चिवट जीवनवाद सांगणारे राजे होते. तसाच त्यांचा प्रिय मित्र 'कवि कुलेश' हा सुद्‌धा एक तेजस्वि व्यक्तिमत्व असणारा होता. अशी लेखकाची कांदबरी मध्ये भूमिका आहे. संभाजी महाराज म्हणजे एक प्रचंड झंझावात असून ते एक वादळी आणि वादग्रस्त व्यक्तिमत्व होते व ह्या व्यक्तिमत्त्वाला न्याय मिळवून देण्यात 'छावा' पूर्णपणे यशस्वी झाला आहे.

संभाजी राजांचे जीवन चित्रण करीत असतना सांवतांनी तात्कालीन, राजकीय, सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचा अतिशय बारकाईने अभ्यास केला आहे. तसेच ते त्याकाळाशी इतके एकरुप झालेत की, इतिहासातील काही जागा त्यांनी काल्पितांनी भरुन काढल्या असल्या तरी त्या सत्याची प्रचिती देणाऱ्या ठरतात. त्यामुळे वाचकांच्या पुढे भव्य व एकसंघ साहित्य चित्र उभे राहिले

आहे. प्रस्तुत कादंबरीत लेखकांनी संभाजी महाराजांच्या स्वभावाचा अन्वयार्थ लावण्याची यशस्वी प्रयत्न केला आहे. तसेच संभाजी राजांच्या हातून ज्या घटना घडत गेल्या त्या घटनांची योग्य ती कारण मिमांसा करुन त्याच्या मागचा अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न सावंतांनी केला आहे. त्यासाठी त्यांनी मनोविश्लेषणाचा आधार घेऊन राजांच्या जीवनावर तर्कशुद्ध प्रकाश तर टाकलाच आहे. त्या सोबत त्यांना योग्य तो न्याय दिला आणि वाचकांना एक रसंपन्न ऐतिहासिक कादंबरी दिली.

'छावा' ही कादंबरी '८५८' पृष्ठांची असून छ. संभाजी राजांच्या जन्मापासून अंतिम वीरोचित बलिदाना पर्यंतच्या ३२ वर्षातील मराठ्यांच्या इतिहासातील सर्व घटनांचे चित्रदर्शी दर्शन लेखकाने यात घडविले आहे. या कादंबरीत सावंतांनी आपल्या लेखन सामर्थ्याने शेकडो व्यक्तिरेखा अक्षरशः सजीव केल्या आहेत. संभाजी राजां सारख्या विवाध नायक निवडून सावंतांनी एक आव्हानच यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

शिवाजी सावंत यांनी आपल्या कांदबरीत संभाजी राजांचे व्यक्तिमत्व प्रकाशात आणताना छ. शिवाजी महराजांच्या कार्य कर्तुत्वाला कोणत्याही प्रकारचा कमीपणा येऊ नये याची दक्षता घेतली आहे. छ. शिवाजी महाराजांच्या वर असणारे प्रेम सावंतांनी या कादंबरीच्या शीर्षकातूनच व्यक्त केले आहे. 'छावा' म्हणजे सिंहाचा बछडा. या कादंबरीतून सावंतांनी संभाजी राजांना 'छावा' च्या रुपात उभे केले आहे. तर छ. शिवाजी महाराजांचा मोठेपणा अप्रत्यक्ष पणे व्यक्त केला आहे.

शिवाजी सवंतांच्या 'छावा' या कादंबरीला सुद्धा या काळात अमाप लोकप्रियता लाभली असून भारतीय ज्ञानपीठाने तिचे हिंदी मध्ये भाषांतर केले आहे. तसेच या कादंबरीच्या आजपर्यंत १० च्यावर आवृत्त्या निघाल्या असून तिने अनेक पुरस्कार व मानसन्मान सुद्धा मिळविले आहेत.

३) **युगंधर –**

वीस वर्षाच्या अथक परिश्रम व अभ्यासानंतर '२०००' साली शिवाजी सावंतांची 'युगंधर' ही तिसरी कादंबरी प्रकाशित झाली. भारतीय समाज समूहातील एकमेव गुण पुरुष म्हणून गणला गेलेल्या श्री कृष्णाच्या संपूर्ण चरित्राचा पट ह्या कादंबरीत वाचकांच्या समोर सावंतांनी मांडला आहे. मात्र असे करीत असताना सावंतांनी श्री कृष्ण चरित्रातील अपवाद वगळता सर्व चमत्कारांना बुद्धि पुरस्सर दूर सारले आहे. कारण श्री कृष्णाची बाजू हजारो वर्ष उजेडातच आहे मात्र चमत्कारांच्या अंगड्या टोपड्यामुळे व त्याच्यावर पडलेल्या श्रद्धाशील पण अतिरेकी प्रकाश झोतामुळे तो कुणालाही उघड्या डोळ्यांनी बघता येत नव्हता. कुरुक्षेत्रावर अर्जुनाच्या सखा म्हणून वावरणाऱ्या श्रीकृष्णाच्या चरित्राला

लागेली चमत्कारांची पुट काढुन त्यांला सर्वसामान्य वाचकांचा सखा म्हणून बोलते करण्याचे कार्य सावंतांनी 'युगंधर' या कादंबरीत केले आहे आणि हीच त्यांची युगंधर लेखनामागची भूमिका आहे.

आजपर्यंत भिन्न भिन्न भाषामध्ये वेगवेगळ्या प्रतिभावंतांनी आपल्या वाङमयीन कलाकृती मध्ये श्रीकृष्णाच्या चरित्राला रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र त्या मध्ये श्रीकृष्णाच्या बाललीलांचा व चमत्कारांचाच अधिक वापर केला आहे. कादंबरी सारख्या वाङमय प्रकाशात श्रीकृष्णाच्या संपूर्ण चरित्राचा आढावा घ्यायचा प्रयत्न कोणत्याही साहित्यिकाने केला नव्हता. परंतु शिवाजी सावंतांनी श्रीकृष्णाला त्याच्या सर्व आयामासह कादंबरीत शब्द करण्यात यश मिळविले आहे. असे करीत असताना त्यांनी श्री कृष्णाच्या व्याक्तिमत्त्वामध्ये दडलेल्या वेगवेगळ्या पैलूवर सुद्धा अभ्यास पूर्ण प्रकाश टाकला आहे. मात्र त्याच्या मूळ व्यक्तिमत्त्वाला कुठे सुद्धा धक्का लावला नाही व त्याला एक परिपूर्ण माणूस म्हणून वाचकांच्या समोर उभा केला आहे.

श्री कृष्णाच्या व्यक्तिरेखेचे पुर्नमुल्यांकान करीत असतना सावंतांनी श्री कृष्णाला पूर्ण पुरुष ठरविणाऱ्या सर्व गुण वैशिष्ट्यांना आपल्या कादंबरीत व्यक्त केले आहे. महाभारतीय युद्धाच्या ऐन प्रसंगी अर्जुना सारखा महावीर हतोत्साह झाला असतांना त्याला केलेला तत्त्वज्ञानपर हितोपदेश समस्त विश्वाला गेलो पाच हजार वर्ष मार्गदर्शक ठरला आहे आणि असे कर्तुत्व करीत असताना बालपणी एक सामान्य गोप, तरुणपणी एक युद्ध कुशल यादववीर व युद्धात सारथी म्हणून जबाबदारी पार पाडणाऱ्या मुसद्धी श्रीकृष्णाच्या व्यक्तिरेखेकडे वास्तव दृष्टिने बघितलेले नव्हते. केवळ जडजंबाल तत्त्वज्ञान सांगणारा हाच त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता. परंतु शिवाजी सावंतांनी त्याला 'युगंधर' मध्ये कुटुंबवत्सल, वर्ण निर्भयतेचा व पौरुष चैतन्याचा प्रतिक, शिरोधार्थ मानावी अशी जीवन प्रणाली जगणारा महामानव, स्त्रीकडे कसे बघावे यांचा भारतीय जीवन प्रणालीत अतिशय चांगला आदर्श उभा करणारा अष्टवधानी अशा अनेक विध रुपासह साकार केला आहे असे करीत असताना सावंतांनी श्री कृष्णाच्या चरित्राला तो काही उणेपणा देण्यात आला आहे. त्याचे सुद्धा अभ्यासपूर्ण खंडन करण्यात यश मिळविले आहे.

या सर्व गोष्टी मुळे वाचक श्रीकृष्णाच्या व्यक्तिरेखेकडे पारंपारिक दृष्टिकोनातून न पाहता त्याच्या प्रत्येक कृती मागील अन्वयार्थ शोधण्याच्या भुमिकेतून पाहतो. हेच 'युगंधरचे' यश आहे.

२) **नाटक –**

अ) **मृत्युंजय –**

शिवाजी सांवत यांचा मूळपिंड हा कादंबरी काराचा होता परंतु 'मोहन वाघ' यांच्या आग्रहा खातर त्यांनी आपल्या 'मृत्युंजय' या कादंबरी वरुनच नाटक लिहिले आहे. आपल्या स्वत:च्या कादंबरी वरुन नाटक लिहिण्यात काही फायदे असतात. तर काही तोटे असतात. फायदे असे की, लेखक त्या कलाकृतीच्या मूलस्त्रोताशी एकात्म झालेला असल्या कारणाने त्या कथानकातील संपूर्ण वळणे त्याला माहित असतात. त्यामुळे त्यातील सौंदर्य स्थळे त्याला संपूर्णत: ज्ञात असतात. त्यामुळे तो एक परिपूर्ण असे नाट्य शिल्प निर्माण करु शकतो. तोटा असा की, त्या सर्जकाचे सर्जनशील व्यक्तिमत्व जर अनेक अंगानी कलाकृतीशी एकतानता पावलेले असेल तर नाट्यकृती निर्माण करताना त्याला जी एक अलिप्तता आवश्यक असते तशी ती रहात नाही. कादंबरीच्या रुपाने आपण जेजे मांडले आहे सांगितले आहे. ते सारे नाट्यरचनेत यावे असा रेटा त्याच्या अव्यक्त मनातून येण्याची दाट शक्यता असते. मुळातल्या लेखणीला कादंबरी लेखनाचे एक घाटदार वळण असते ते मोडून नाटकाच्या निमित्ताने एक वेगळी नवनिर्मिती करायची असते. ते एक नवे आवाहन व आव्हानही असते' याचे भान सावंतांनी नाटकाच्या सुरुवाती पासून ठेवलेले दिसते.

शिवाजी सावंत यांनी आपल्या 'मृत्युंजय' या नाटकामध्ये कर्णाच्या जीवनावरील शोकांतिका अतिशय सूचकतेने आणि संयमाने हाताळली आहे व कोठेही भडकतेचा आश्रय घेतलेला नाही की आक्रस्ताळेपणाही केला नाही. त्यामुळे त्यांचा हा संयम नाट्यात्मकतेचा परिणाम साधायला उपयोगी ठरलेला नाही. दु:ख परंपरेतील नायकाची शोकात्मिका भिन्न भिन्न कारणाने घडत असते. कर्णाच्या संदर्भात नियती हा प्रधान घटक होता. 'मृत्युंजय' या नाटकात सावंतांनी तो घटक सुत्ररुपाने वापरला आहे. त्यासाठी रथचक्राचा सावंतांनी प्रतिक रुपाने अतिशय परिणामकारक उपयोग केला आहे. कर्ण आणि नियती यांच्या संघर्षावर आधारित या नाटकामध्ये नियतीचा व कर्णाचा प्रत्यक्षात दोनदा संवाद झालेला दाखविला आहे. एक नाटकाच्या प्रारंभी व दुसरा कुरुक्षेत्रावरील रथचक्र उद्‌धरणाच्या वेळी जमीनीत रुतलेले चाकच नियतीबनून कर्णाशी संवाद साधते. त्यामुळे संपूर्ण नाटकात परिणामकारकता कायम राहिलेली दिसते. तसेच या नाटकात ज्वलंत, जिवंत दृश्यात्मकता व भावनिक स्तरावरची दाहकता सुद्‌धा आहे. कारण हे नाटक व्यावसायिक आडाख्यानुसार बेतलेले आहे.

'मी कोण आहे?' हा खरा तर कर्णाला पडलेला प्रश्न परंतु या प्रश्नालाच कथा बीज बनवून सावंतांनी कसदार भाषेच्या मदतीने सुभाषितांचे व प्रतीकांचे उपयोजन करुन नाटकाला गतिमान केले

आहे. या नाटकातील कर्ण वेळोवेळी मरणाहून वाईट अशा अपमानांना वारंवार सामोरा जात असतो. त्यामुळे त्याच्या अंत:करणात एक प्रचंड सल साठलेली दिसते. परंतु ह्या वेदनेच्या आहारी जाउन तो ऐकारलेपणे, उद्विग्नपणे जगताना दिसत नाही. याऊलट तो कुंतीच्या भेटीच्या वेळी आपल्या मातेची आगतिकता पाहून भाववश होताना दिसतो.

शिवाजी सावंत यांनी 'मृत्युंजय' मध्ये कर्णाची पत्नी वृषाली व त्याचा पालक बंधूक्षोण यांच्या माध्यमातून कर्णाच्या गृहजीवनातील विविध पैलू साकारलेले आहेत. तसेच कर्णाच्या जीवनातील संभ्रमितता सुद्धा अत्यंत सखोलपणे चित्रीत करण्यात सावंतांनी यश मिळविलेले आहे. त्यामुळे 'मृत्युंजय' हे नाटक ग्रीक नाट्य परंपरेमधील वाटते. कारण ग्रीक नाट्य परंपरेतील शोकात्म नायकाच्या वाट्याला आलेले दु:ख हे दैवी घटनेच्या परिपाक मानले जाते आणि ते त्याला नियतीच्या हातांतील एक असहाय बाहुले बनुन ते सहन करावेच लागते. सावंतांनी सुद्धा हीच दृष्टिठेवून 'मृत्युंजय' नाटकाची निर्मिती केलेली दिसते.

कादंबरीप्रमाणे आपल्या नाटकामधून सुद्धा कर्णाला सक्षमपणे पूर्णत: न्याय देण्यात सावंत यशस्वी झाले आहेत. अशा 'मृत्युंजय' या नाटकाचे तब्बल एक हजाराच्या वर प्रयोग झाले असून 'साहित्य सागर, जयपूर' या संस्थेने या नाटकाचे हिंदीमध्ये 'संघर्ष' या नावाने भाषांतर केले आहे.

ब) **छावा –**

'चंद्रलेखा' या नाट्यसंस्थे मार्फत '१ मे १९८३' साली रंगमंचावर आलेले 'छावा' हे शिवाजी सावंतांचे दुसरे व्यक्तिचित्रणात्मक नाटक आहे. हे नाटक रंगमंचावर येई पर्यंत मराठीत संभाजी राजांच्या जीवनावर बरीच नाटके आली होती. 'राजसन्यास', 'बेबंदशाही', 'रायगडला जेव्हा जाग येते', 'इथे ओशाळला मृत्यु', गुणोत्कर्ष, शिवाजीला शह, धर्मवीर संभाजी इ. नाटकांच्या शीर्षका वरुनच नाटकांच्या कथा वस्तूची कल्पना येते.

'छावा' या आपल्या तीन अंकी नाटकामध्ये सावंतांनी रचनेच्या बाबतीत एक वेगळा प्रयोग केलेला आहे. नाटकाच्या प्रारंभीच संभाजी राजांच्यावर करण्यात आलेले आरोप एका वाटसरुच्या रुपाने वदविले जातात. त्याचवेळी 'तूळापूर - वढू' येथील संभाजी महाराजांची समाधी दुभंगत व त्यातून स्वत: राजे प्रकटतात व सर्व आरोपांचे खंडन आत्मनिवेदन पद्धतीने करतात. हे एक आरंभ सूत्र आहे. नाट्यमय वाटणारे अपेक्षित परिणाम साधावा या हेतूने हे तंत्र योजलेले आहे. मात्र प्रत्यक्ष प्रयोगात ते तितकेसे यशस्वी झाले नाही. कारण त्यावेळी नाट्यतंत्र पूर्णपणे विकसित झाले होते. त्यामुळे अशा

योजनांचे प्रेक्षकांना कौतुक राहिले नव्हते. तसेच हा प्रसंग व त्या नंतरचे नाटक ह्या मध्ये कोणत्याही प्रकारच्या अनुबंध राहिला नसल्यामुळे हे समाधी आगमन प्रेक्षकांच्या मनात प्रश्न चिन्हाच्या स्वरुपात रेंगाळतच राहिलेले दिसते.

ह्या नाटकाचे कथानक हे छ. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर राजगादीसाठी जे काही राजकारण सुरु झाले. त्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर संभाजी महाराजांचा जो काही अतोनात छळ झाला. त्याचे परिणामकारक चित्रण या आशया भोवती फिरते.

हया नाटकातील ऐतिहासिकपणा जपणारी भाषा हे ह्या नाटकाचे बलस्थान असून प्रत्येक पात्राच्या तोंडची भाषा ही प्रसंगी प्रेक्षकांच्या काळजाला जाऊन भिडते. त्यामुळे ऐतिहासिकतेच्या सर्व मर्यादांचे काटेकोर पालन करुन लिहिलेले 'छावा' हे नाटक म्हणजे संभाजी महाराजांच्या जीवनावरील ऐतिहासिक भाष्य नाटयच ठरते.

'मृत्युंजय' मधील 'कर्ण' आणि 'छावा' मधील 'संभाजी राजे' म्हणजे कर्तृत्व असून देखील नियतीच्या दृष्ट चक्रात सापडून शोकात्म जीवन जगणारे नायक होते. अशा नाटकांच्या जीवनावर आधारित असणाऱ्या ह्या दोन नाटकांना त्यावेळी अफाट लोकप्रियता लाभली.

## चरित कहाणी

शिवाजी सावंताचा मित्र परिवार हा केवळ साहित्य प्रांतातीलच होता असे नव्हे, तर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रिडा इ. क्षेत्रामधील लहानापासून दिग्गजापर्यंत त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. कोणत्याही व्यक्तीशी मैत्री करण्यासाठी सावंतांना वय, जात, दर्जा यासारख्या गोष्टी कधीच आड आल्या नाहीत. साहित्याच्या बाबतीत सुद्धा त्यांना कोणताही विषयी वर्ज्य नव्हता. 'मृत्युजंय' सारखी पौराणिक विषयावरली अथवा 'छावा' ही ऐतिहासिक विषयावरील कादंबरी पाहिल्यानंतर सावंतांना इतिहास, पुराण याचा दांडगा व्यासंग होता हे लक्षात येते.

या नंतरच्या काळात शिवाजी सावंतांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रीय असणाऱ्या व्यक्तींच्या जीवनावर अभ्यास सुरु केलेला दिसतो. कारण सावंतांची लेखणी आणि दृष्टी सतत आदर्शाचा शोध घेणारी दिसते. हे त्यांच्या प्रकाशित आणि संकल्पित सहित्यावर नजर फिरवल्यानंतर लक्षात येते. त्यामुळे आदर्शाची बाजू पूजा बांधणारे साहित्यीक असे देखील सावंतांना म्हणता येऊ शकते. अशा आदर्शा भोवतीच त्यांचे मन सतत रुंजी घालताना दिसते. शिवाजी सावंत म्हणजे नीरक्षीर याचा फरक जाणणारे 'राजहंस' वाटतात. कारण ते व्यक्ती, कार्य परिश्रम, साहस, धैर्य बुद्धि, शक्ति

पराक्रम ह्या साऱ्यातून परिपूर्ण ठरलेल्या व्यक्तिरेखाच निवडतात आणि आपल्या प्रतिभेचे सर्व संस्कार त्यावर करुन रोकडेपणाने रसिक वाचकांच्यासमोर सादर करतात.

**अ) लढत –**

सहकार आणि कामगार हे शिवाजी सावंतांचे अत्यंत जिव्हाळ्याचे विषय होते. याच प्रेमातून त्यांनी आशिया खंडात शेतकऱ्यांचा पहिला साखर कारखाना उभा करणाऱ्या 'कै. डॉ. पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील' यांच्या चरित कहाणींला हात घातला. या चरित कहाणीसाठी सुद्धा सावंतांनी अनेकांच्या मुलाखती घेतल्या. अनेक संदर्भ अभ्यासले व त्यातूनच त्यांनी 'लढत' ही अशिक्षित परंतु कमालीच्या जिद्दी शेतकऱ्याची सत्य कथा साकार केली. एखाद्या ध्येयाच्या पूर्तीसाठी तीस-चाळीस वर्ष उरीपोटी धावणाऱ्या एका ध्येय वेड्या गावरान माणसाची ही एक लोकविलक्षण कथा आहे. सुर्याच्या जातकुळीचा वारसा ऊरभर मिरविणाऱ्या वर वर बावळ्या वाटणाऱ्या पण अंतरीकर्म योग्याच्या कळा दाटणाऱ्या पद्मश्री विखे - पाटीलांच्या रुपात त्यांनी मराठी मातीतला एक नायकच मिळवून दिला. सतत कर्म करीत कर्मयोगी अवस्थित जाऊनही त्या कर्तुत्वाचा अहंकार न बाळगणारे विखे - पाटील हे 'लढत' मध्ये एकीकडे कर्मयोगी तर दुसरीकडे कर्म संन्यासी या भूमिकेतून उभे राहिलेले दिसतात. या कर्मयोगी संन्याशाची कथा सावंतांनी अत्यंत अचूक शब्दात आपल्या 'लढत' या व्दिखंडात्मक कादंबरीत मांडली आहे.

'लढत' या चरित कहाणीत शिवाजी सावंतांनी 'डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील' यांचे संपूर्ण चरित्र हे तत्कालीन सार्वजनिक स्वरुपातील घटना आणि त्यांचा होत जाणारा विकास या पार्श्वभूमीवर चित्रित केले आहे. त्यामुळे 'लढत' ही चरित कहाणी सामाजिक स्थित्यंतर व चरित्र नायकाचे जीवन या दोन समांतर रेषेत वाढताना दिसते.

अशा या 'लढत' या व्दिखंडात्मक चरित कहाणीचे प्रकाशन '१९८६ साली कै. शंकरराव चव्हाण' यांच्या उपस्थितीत डॉ. विठ्ठलराव विखे-प्राटील यांच्या जन्मभूमीत आणि त्यांनी स्थापन केलेल्या प्रवरा सहकारी साखर कारखाना, प्रवरानगरच्या प्रांगणात झाले.

ब) **संघर्ष –**

शेतकरी आणि कामगार ही देशाच्या विकास रथाची प्रमुख दोन चाके आहेत. यांच्यावरच देशाच्या विकासाची खरी जबाबदारी आहे. ह्या दोन्ही घटकांबद्दल शिवाजी सावंतांना अत्यंतिक आदर होता. ह्या आदरापोटीच त्यांनी ध्येयवेड्या कर्म योग्याची कहाणी लढत मध्ये चित्रीत

केली तर माथाडींना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देणाऱ्या 'भाई मनोहर कोतवाल' यांच्या लढ्यांची कथा त्यांनी 'संघर्ष' या चरित - कहाणीत चित्रीत केली आहे.

आजच्या झगमटाच्या समाजात माथाडीचे अस्तित्व कुठेच जाणवत नाही. त्यांच्या पगार वाढीचे अथवा उपासमारीचे कोणालाच देणे घेणे नाही. अशा परिस्थितीत माथाडींच्या हक्कासाठी झटणाऱ्या 'कोतवालांच्या' जीवनावर सावंतांनी 'संघर्ष' ही चरित कहाणी लिहीली आहे. यामध्ये कोतवालांच्या जन्मापासून (१९१५) ते त्यांच्या अमृत महोत्सा पर्यंतचा (१९९०) जीवन प्रवास चित्रीत करण्यात आला आहे. 'संघर्ष' या चरित कहाणीत सावंतांनी 'भाई कोतवालांचे' संपूर्ण जीवन तर चित्रीत केले आहेच. त्या बरोबर त्या त्या काळातील कामगार चळवळ, त्या क्षेत्रातील नेते, राजकीय आणि सामाजिक उलथापालथी यांचा ही समांतर असा धावता आढावा घेतला आहे. त्यामुळे कोणत्या सामाजिक, राजकीय परिस्थितीत भाई कोतवालांचे आयुष्य घडले याचे चित्र वाचकांच्या समोर उभे रहाते.

शिवाजी सावंत यांना कामगारांच्या बद्दल अत्यंत जिव्हाळा होता. हा जिव्हाळा भाई कोतवालांचे चरित्र चित्रण करित असताना वेळोवेळी संघर्ष मधून प्रकटला आहे. समाजातील रुढिग्रस्ततेला त्या काळात न जुमानता भाई कोतवाल यांनी आपला विवाह नोंदणी पद्धतीने केला होता व लग्नाच्या अवास्तव खर्चाला पूर्णपणे बंगल दिली होती. ह्या प्रसंगाचे वर्णन करुन सावंतांनी ह्या लग्नाचे वैशिष्टय कामगार बंधूनी लक्षात घेण्यासारखे आहे. असा अप्रत्यक्ष काटकसरीचा संदेश दिलेला दिसतो.

कामगार हा एक माणूस आहे. कामगार ही त्याची जात आहे. त्याच्यावर होत असलेला अन्याय निपटण्यासाठी प्राणपणाने हयातभर झगडत रहायचे यश येवो अगर न येवो. थांबायचे नाही. असा कर्म सिद्धांत उराशी बाळगणाऱ्या व कामगार चळवळीवर अभंग श्रद्धा असणाऱ्या भाईंनी कामगार हितासाठी केलेले कष्ट, त्यांच्या मनातली तळमळ आणि 'भाई कोतवाल' नावाचे उत्तुंग व्यक्तिमत्व हे सर्व 'संघर्ष' या चरित-कहाणीत शिवाजी सावंतांनी अत्यंत तळमळीतून साकार केले आहे.

'१९९५' साली 'संघर्ष' ही चरित - कहाणी प्रकाशीत झाली व एक कामगार नेता साहित्य कृतीचा विषय होऊ शकतो. हे शिवाजी सावंतांनी निर्विवाद पणे सिद्ध केले.

४) **व्यक्तिचित्रे –**

शिवाजी सावंत हे मनाने अत्यंत मोकळे व दिलखुलास वागणारे होते. त्यामुळे संपर्कात आलेल्या प्रत्येक माणसाशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध तयार होत होते. ते संबंध सावंत अभेद्यपणे टिकवत

होते. संपर्कात आलेल्या माणसां जवळचे गुण शोधण्याचे कसब देखील त्यांच्याकडे होते. अशा संपर्कातल्या माणसांना त्यांच्या गुणवैशिष्ट्यासह साहित्यात शब्दबद्ध करण्याचे काम सावंतांनी अशी मने असे नमुने आणि मोरावळा या दोन संस्मरणीय व्यक्तिचित्रणातून केले आहे. मराठी साहित्य विश्वामध्ये व्यक्तिचित्रण हा वाङमय प्रकार उपेक्षित, दुर्लक्षित, राहिल्याकारणाने तो अभावानेच आढतो. मराठी वाङमय विश्वामध्ये कुमार रघुवीर यांचा 'हृदय (१९३२)' 'श्री. म. माटे यांचा उपेक्षितांचे अंतरंग' पु.ल. देशपांडे यांचा व्यक्ति आणि वल्ली, व्यकंटेश मांडगुळकरांचा माणदेशी माणसे 'अशा काही व्यक्तिचित्रणात्मक कलाकृती' अमर राहिल्या आहेत. ह्याच पंक्तीमध्ये शिवाजी सावंत यांचे 'अशी मने असे नमुने' आणि मोरावळा' ही दोन व्यक्तिचित्रणे आहेत.

## अ) **अशी मने असे नमुने –**

'आजरा' हे शिवाजी सावंतांचे जन्मगाव. या गावातल्या लाल मातीत बागडत व माणसांच्या सहवासातच ते लहानाचे मोठे झाले. त्यामुळे या गावातल्या माणसांच्या बद्दल त्यांच्या मनात एक वेगळेच स्थान होते. या बद्दल सावंत प्रास्ताविकात लिहितात ''माझ्या साहित्यिक वाटचालीत आजऱ्याला फार मोलांच आणि अविस्मरणीय असं स्थान आहे. ही आहेत आजऱ्याकडची घाटोळी माणसे माझ याच प्रत्यक्ष रक्तान जमलेले अस कोणतच नात नाही; पण रक्तापेक्षा माती अधिक दाट असते !'' माणसाच्या अबोध आणि कोऱ्या मनाची पाटी जिथं घडते बनते तो परिसर फार फार महत्त्वाचा असतो. अस मला वाटतं ..... माझ्या मनाच्या तळवटी कुपीत या नमुनेदार मनांचा अत्तरी स्वभाव मी अपूर्वाइन जपला आहे. त्यांच्या नाही माझ्या आत्मिक समाधानासाठी.

'अशी मने असे नमुने' या संग्रहात लेखकाच्या जीवनाशी एकरुप झालेली लेखकाशी जीवनरुप झालेली अनेक प्रकृतीधर्माची माणसे भेटतात. सावंतांच्यावर अतूट प्रेम करणारी निष्पाप अंत:करणाची ही माणसे किती तरी आगळी जगतात. त्यांच्या ह्या जगण्यावरच लेखकाने नितांत प्रेम केलेले दिसते. त्यामुळे 'अशी मने असे नमुने' या व्यक्तिचित्रणातून सावंत त्यांच्या आठवणींना कुरवाळताना दिसतात. त्यांच्या ह्या पुस्तकातील 'बामणाचा कांत्या,' गवळ्याचा गणप्या, कुंणबी संतू, तुकाराम बापू, खुदबू, टी,डि तोतरा दत्तू, नारायण पावणा, जिगरबाज मामू, गोसाव्याचा शंकऱ्या, सार्वजनिक काका म्हणून ओळखला जाणारा काका गवंडळकर, तसेच व्यक्तिचित्रणातील एक उत्तम व सदा स्मणीय ठरलेली व्यक्तिचित्र म्हणजे 'खडका वरची म्हातारी' तसेच एका सक्षम ऋणानु बंधाची, आंतरित भाव नात्याची आणि लेखकाच्या मर्मबंधाची उकल करणारी व्याक्तिरेखा म्हणजे 'पांचवा सावंत' या प्रत्येक व्याक्तिरेखा जीवनाच्या एका सकस जाणिवेत नमुनेदार तर आहेतच, पण मधाच्या पोळ्यासारखी ती माणुसकीच्या

सहज स्त्रोतांन शिगोशीग भरलेली देखील दिसतात. या व्यक्तिचित्रणांमध्ये सावंतांनी त्या त्या व्यक्तिरेखांच्या आसपासचा परिसर सुद्धा अस्सल ग्रामीण बोलीत सजीव केलेला दिसतो.

'अशी मने असे नमुने' ह्या व्यक्तिचित्रच्या पहिल्या आवृत्तीचे नाव होते 'लाल माती हिरवी मने' ह्या अवृत्तीचे प्रकाशन 'आधुनिक वाल्मिकी म्हणून गौरव प्राप्त केलेले गीतरामायणाचे जनक ग. दि. माडगूळकरांच्या' हस्ते करण्यात आले होते. या पहिल्या आवृत्तीच्या नावावरुनच आपणाला ह्या पुस्तकातील व्यक्तिचित्रणे ही आजऱ्याच्या लाल मातीत वावरणाऱ्या व्यक्तिचिच असणार हे वाटते आणि या पुस्तकाच्या प्रस्तावनेमधून सुद्धा सावंत यांची कबुली देतात. मात या पुस्तकामध्ये 'कॉन्टिनेंटल' प्रकाशनचे संस्थेचे मालक अनंतराव कुलकर्णी व ग.दि. मांडगूळकरांची व्यक्तिचित्रणे करणारी दोन प्रकरणे होती. त्यामुळे हे पुस्तक आपल्या शीर्षकाशी व प्रस्तावनेशी विसंगत वाटत होते. १९९८ साली शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) हे पुस्तक 'बी. ए. भाग -२ (मराठी)' च्या वर्गाच्या अभ्यासक्रमात घेतले. परंतु वरील तांत्रिक अडचण उभी राहिली. त्यावेळी कॉन्टिनेंटल मालक 'अनिरुध्द कुलकर्णी' यांनी सावंतांना शेवटची दोन प्रकरणे वगळण्यास सांगितले मात्र शिवाजी सावंतांना 'ग. दि. माडगूळकर', वि. वा. शिरवाडकर आणि वि. स. खांडेकर या सारख्या साहित्यिक व्यक्ति म्हणजे आराध्य दैवतच होती. त्यामुळे शेवटची दोन प्रकरणे वगळण्यास सावंतांचे मन तयार होत नव्हते. अर्थात याला कारण असे असावे 'मृत्युंजय' या कादंबरीच्या प्रकाशनाच्या वेळी जी परिस्थिती होती. त्या परिस्थितीचे आव्हान स्विकारुन 'ग.दि. माडगूळकर' यांच्या विनंतीवरुन अनंतराव कुलकर्णी यांनी 'मृत्युंजय' ही कादंबरी प्रकाशित केली आणि शिवाजी सावंतांना साहित्य विश्वामध्ये स्थिर व अढळ केले. शिवाजी सावंतांना साहित्य विश्वात स्थिर होण्यासाठी ग.दि. माडगूळकर आणि अनंतराव कुलकर्णी यांचा वाटा फार मोठा असलेला दिसतो. त्यामुळे या दोघांच्या ऋणातून अंश मात्र का होईना उत्तराई होण्याच्या उद्देशाने अथवा हे व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक लिहीत असताना या दोघांच्या प्रेमा बद्दलचा किंवा आदराच्या भावनेचा रेटा जास्त दाटुन आल्याकारणाने सुद्धा त्यांनी ही दोन प्रकरणे लिहिली असावीत.

सरतेशेवटी सावंतांनी ही दोन प्रकरणे वगळल्यास संमती दर्शविली मात्र त्याची सल त्यांच्या अंत:करणात खोलवर रुतत राहिली असावी. ही दोन प्रकरणे वगळ्यानंतर 'लाल माती हिरवी पाने' या पुस्तकाची दुसरी आवृत्ती '१९७५ साली' 'अशी मने असे नमुने' या नावाने प्रकाशित केली व ती शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात सामवली गेली. या व्यक्तिचित्रणाचे 'दिल्ली मधील वाणी प्रकाशनाव्दारे' 'ऐसे लोग - ऐसी बाते' या नावाने अनुवाद देखील करण्यात आला आहे.

ब) **मोरावळा –**

आराध्य मानलेल्या व दैवत रुप असणाऱ्या व्यक्तींच्या जीवनावर आधारित व्यक्तिचित्रणांना पुस्तकातून वगळण्याची सल सावंतांच्या मनात जी होती. तिला नष्ट करण्याचा एकच मार्ग तो म्हणजे दुसरी व्यक्तिचित्रणात्मक कलाकृतीची निर्मिती करावयाची आणि याच उद्देशाने प्रेरित होऊन त्यांनी 'मोरावळा' ह्या दुसऱ्या व्याक्तिचित्रणात्मक पुस्तकाची निर्मिती केली असावी.

या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकामधील सर्व व्यक्ति ह्या आपापल्या क्षेत्रात मोरावळ्या सारख्या मुरलेल्या आणि कर्तबगार वर्गात मोडणाऱ्या आहेत. त्यामध्ये शिक्षण, राजकारण, समाजकारण, प्रकाशन व साहित्य क्षेत्रातील व्यक्ति आहेत. या पुस्तकाच्या प्रारंभीच आर.के. कुलकर्णी यांच्या रुपाने स्नेहाचा भावपूर्ण अनुभव येतो. 'भैय्यासाहेब' मध्ये साक्षात 'अनंतराव कुलकर्णी' भेटतात. तसेच 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ह्या स्वतःच्याच ओळीवर मात करणारे ग.दि. माडगूळकर उर्फ आण्णा यांची उपस्थिती सुद्धा वाचकांचे लक्ष वेधते. तर साने गुरुजींचा सहवास लाभलेले शिक्षण क्षेत्रातील निखळ मनाचे निदर्शक मित्र अशोक गगराणी भेटतात. तर राजकीय क्षेत्रातील प्रति सरकार स्थापन करुन रणकल्लोळ उठविणारे क्रांतिवीर 'नाना पाटील' भेटतात. राजकारणातील एक उत्तुंग महा मानवाचे दर्शन सुद्धा मोरावळा मध्ये होते. ते म्हणजे 'स्व. यशवंतराव चव्हाण' होय.

मात्र या पुस्तकाच्या वेळी सावंतांच्या मनात भावनांचा आवेग दाटुन आला असावा. त्यामुळे 'मोरावळा' मध्ये सुद्धा त्यांनी 'अशी मने असे नमूने' च्या ग्रामीण बाजाला शोभतील अशी 'तानु मावशी' आणि 'चिलू मोरबाळा' ही दोन ग्रामीण जिगरबाज व्यक्तिचित्रे आणली आहेत.

'अशी मने असे नमुने' व 'मोरावळा' ह्या दोन्ही पुस्तकांनी मराठतील व्यक्तिचित्रणात्मक साहित्याचा प्रवा निश्चित समृद्ध केला आहे. या पुस्तकातील व्यक्तिचित्रा बरोबर लेखकाने त्या व्यक्तिच्या आसपासच्या परिसर देखील फुलविला आहे. त्याच बरोबर तात्कालिन, समाजिक, राजकीय संदर्भाचा स्पर्श सुद्धा या व्यक्तिचित्रणांना झाला आहे. तसेच तरल काव्यात्मकता विविध भावनांच्या अविष्कारातील लेखणीने घेतलेली वलयदार वळणे, अचंबित करणारी शब्दकळा, शैलीतील गुढरम्यता यामुळे या पुस्तकातील लेख नवे उन्मेष घेऊन आकाराला आलेला आहे.[१] या पुस्तकातील सर्व लेखन हे सरस, सकस, सुरेख व सौरभपूर्ण झाले आहे आणि तेच त्यांचे साहित्यिक बळ आहे.

## ५) ललित लेख –

'शेलकासाज' आणि 'कांचनकण' ही शिवाजी सावंत यांची दोन ललित लेखांची पुस्तके असून कादंबऱ्यांच्या महायज्ञातून जो काळी मोकळा वेळ मिळलत होता. त्या वेळेत निर्माण केलेल्या लहान कलाकृतीच आहे. कादंबऱ्या निर्मिती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या ऐतिहासिक, पौराणिक साहित्य वाचत असताना काही प्रसंग, काही व्यक्तिरेखा सावंतांच्या मनावर बिंबल्या अथवा त्यांच्या मनात जर काही प्रश्न निर्माण झाले तर त्यांना सांवत लेखांच्या स्वरुपात शब्दरुपकरित असत. या लेखनाला त्यांनी कधी कथात्मकरुप दिले आहे. तर कधी प्रसंग निवेदनाचे किंवा व्यक्तिचित्रणाचे. मात्र हे किरकोळ वाटणारे त्यांचे लेखन त्यांनी अत्यंतीक साहित्य प्रेमानेच केलेले दिसते. पाषाणामध्ये मोठे शिल्प कोरीत असताना त्या पाषाणाच्या मधून पडलेल्या बारीक दगडातून दुसरी छोटी शिल्पकृती करण्या सारखेच सावंतांचे हे कार्य आहे. त्यामुळे शिवाजी सावंतांचे हे लेख संग्रह म्हणजे त्यांच्या अजरामर कलाकृतींचाच एक अविभाज्य भाग असलेला दिसतो.

### अ) शेलका साज –

शिवाजी सावंतांचा 'शेलका साज' हा '२२' लेखांचा संग्रह नावाप्रमाणेच शेलका असलेला दिसतो. या लेख संग्रहातील प्रारंभीचे काही लेख शिवकालावर आधारित आहेत. 'किल्ले सुधागड', 'शिवभक्त सरलष्कर' अशी काही नावे सांगता येतील. यातील 'शिवकालीन मावळा' या लेखात मावळ्यांचे रहाणे, पेहराव, जगणे, लढणे याची माहिती देण्यात आली आहे. तर शिवजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वांचे गुढरम्य पैलू दाखिणारा 'मनफूल' हा लेख सुद्धा अत्यंत सूचक आहे. तसेच कामगार नेते 'भाई मनोहर कोतवाल' पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील आणि अस्पृश्यांचा आधारवड राजर्षि शाहू महाराज यांच्यावर सुद्धा या पुस्तकात लेख आले आहेत. या शिवाय शिवाजी सावंतांनी स्वत: बरोबर घडलेल्या काही घटनांचे वर्णन केले आहे. त्यामध्ये 'चलाख' या लेखात सावंतांनी एका वाचकांने आपणाला कसे फसविले त्याचे वर्णन केले आहे. या शिवाय त्यांनी ललित लेखन देखील केले आहे. त्यामध्ये 'एक विचार' 'मी आणि कविता' या लेखातून त्यांचे साहित्य विषयक चिंतन प्रकट होताना दिसते.

या पुस्तकाच्या शेवटी शिवाजी सावंतांनी आई बद्दलच्या कृतज्ञतेच्या ओथंबलेल्या भावनेतून निर्माण केलेली 'तू नसतीस तर ?'

ही कविता सुद्धा वाचकांचे लक्ष वेधून घेते.

तू - तू नसतीस तर ?

या प्रश्नातच आहे. तू असण्याचे निर्विवाद उत्तर !

कारण माझ्या साठीच नव्हे, सर्वांसाठी

तू नाहीस केवळ एक व्यक्ती वा एक जीव,

तू आहेस एक अतिताप पासून अनागता पर्यंतचे

तत्त्व ज्याचे एकमेवच नाव आहे, असू शकते,

आई !!

शिवाजी सावंतांची ही कविता 'माधव ज्युलियन', कवी यशवंत, नारायण सुर्वे व फ.मु. शिंदे यांच्या आई, वरील कवितेचे स्मरण करुन देते [१०]

## ब) **कांचन कण –**

'कांचन कण' हा शिवाजी सावंतांचा दुसरा ललित लेख संग्रह असून या पुस्तकाच्या शीर्षका वरुनच ह्या पुस्तकामध्ये जे 'अकरा लेख' आहेत त्याचे महत्त्व समजते. सुवर्णालाच कांचन असा समानार्थी शब्द आहे. सुवर्णाचे दागिने बनवित असताना त्यातून काही सोन्याचे तुकडे, कण बाहेर पडतात. अर्थात ते सुवर्णाचे कण असतात. त्यामुळे त्यांचे मोल हे सुवर्णा एवढेच असते. दागिना बनवित असतात ते त्यातून बाहेर फेकले जाता म्हूणन त्यांचे मोल कमी होत नाही. उलट त्या कणांना एकत्र करुन त्यापासून सुंदर दागिना सुद्धा बनविता येऊ शकतो.

'कांचन कण' ह्या लेख संग्रहामध्ये ज्या व्यक्तिंच्यावर लेख लिहिण्यात आले आहेत. त्यांचे संपूर्ण जीवन अथवा त्या स्वत: आपल्या कर्तृत्त्वाच्या बळावर मोठ्या झालेल्या आहेत. शिवाजी सावंतांच्यादृष्टीने या व्यक्तिंचे संपूर्ण जीवन सोन्याच्या मोलाचे झाले आहे. अशा व्यक्तिंच्या काही आठवणी म्हणजे सुवर्ण कणच आहेत. अशा आठवणींना एकत्र गुंफून सावंतांनी 'कांचनकण' नावाचा ललित लेख संग्रह लिहीला आहे.

अकरा लेखांच्या या पुस्तकामध्ये छ. शिवाजी महाराज 'थोरले बाजीराव पेशवे,' यांच्या पासून ते आचार्य अत्रे, गीतरामायणकार ग.दि.मांडगूळकर, संगीतकार वसंत देसाई, साखर सम्राट पद्मश्री

विठ्ठलराव - विखे - पाटील. गोदी कामगार नेते भाई मनोहर कोतवाल इ. व्यक्तिंच्या काही आठवणी ह्यात लेख रुपाने आल्या आहेत. तसेच कोल्हापूर नगरीच्या इतिहासात ज्यांनी आपल्या कार्य कर्तुत्त्वाने स्व:चे असे स्थान निर्माण केले आहे. अशा व्यक्तिंचे गुणगान करणारे काही लेख ही ह्या पुस्तकात आहेत. तसेच दोन लेखांमध्ये शिवाजी सावंतांनी 'संत ज्ञानेश्वराचे' भावविश्व उलगडून दाखविण्याचा सुद्धा प्रयत्न केला आहे.

'मृत्युंजय' : दूरदर्शनचे, दूरदर्शन या आपल्या लेखात तर सावंतांनी 'मृत्युंजय' मालिका रुपाने दुरदर्शनववर दाखविण्याच्या निमित्ताने नोकर शाहीच्या लालफितीचा व मालिका सिद्ध करणाऱ्या 'डॉ. चंद्रप्रकाश व्दिवेदी' प्रभृतींच्या हलगर्जीपणाचे मन अस्वस्थ करणारे निरनिराळे किस्से आले आहेत.

'कांचन कण' मधील प्रत्येक लेख हा निरनिराळ्या प्रकृती धर्माचा आहे. त्यामुळे हे लेख वाचत असताना काही वेळा खटकल्या सारखे भासते. तरीही ही सावंतांची आत्यंतिक जातीवंत अशी साहित्याबद्दलची आत्मीय भावना यात प्रत्ययाला आल्याशिवाय रहात नाही.

'शेलकासाज' व 'काचंनकण' मधील सर्व लेख हे संस्कृत प्रचुर व डौलदार शैलीतले आहेत. उपमान - अलंकार यांनी युक्त असणाऱ्या या लेखान मधल्या साध्या शब्दांना सुद्धा ऐटबाज नखरेल शब्दकळेचे सौंदर्य लाभले आहे. त्यामुळे 'शेलका साज' व 'कांचनकण' मधील सर्व लेख वाचकांचे चित्त खिळवून ठेवतात हेच त्यांचे वाङमयीन यश आहे.

## ६) वैचारिक लेखन -

### अ) युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन -

शिवाजी सावंतांचे हे पुस्तक श्री कृष्णावरील चिंतनातून प्रकटलेले दिसते. युगंधर कांदबरी आपल्या अखेरच्या टप्प्यामध्ये असताना सावंतांनी हे पुस्तक प्रकाशित केले आहे. युगंधर कादंबरी मधील श्री कृष्णाचे व्यक्तिमत्त्व आणि चरित्र हे कोणत्या वैचारिक बैठकीवर आधारित आहे. हे वाचकांना समजुन सांगण्याच्या उद्देशाने सावंतांनी युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन ह्या पुस्तकाची निर्मिती केली असावी. त्यामुळे हे पुस्तक म्हणजे युगंधर ह्या कादंबरीची प्रस्तावनाच वाटते.

'युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन' हे पुस्तक श्रीकृष्णाच्या जीवन चरित्राकडे युगा युगांनी धारण करावी अशी जीवनतत्व श्रीकृष्णान नुसती उच्चारली नाहीत. तर प्रत्यक्ष जगून दाखविली ती कशी याचा उच्चार करतं. तो बहुआयामी असला तरी निकोप दृष्टीने त्याला पाहता. पारखता येऊ शकत हाच या चिंतनाचा प्रमुख दावा आहे.[११]

कोणताही पूर्वग्रह न बाळगता श्री कृष्णाकडे वाचकांना एक निकोप व सुदृढ दृष्टिनेपाहता यावे ही 'युगंधर श्रीकृष्ण: एक चिंतन' या पुस्तकाची निर्मिती करण्या मागची शिवाजी सावतांची भूमिका आहे.

७) **संपादन –**

अ) **क्रांतीसिंहाची गावरान बोली –**

शिवाजी सावंत यांना 'महाराष्ट्र व मराठी भाषा' यांच्या बद्दल अत्यंतिक प्रेम व आदर होता. मराठीतील संत साहित्याकडे सुद्धा सावंत अत्यंतिक आदराने पहात होते. परकीय व परभाषेच्या आक्रमणात मराठीचे मराठीपण टिकवण्याचा व तिला वाढविण्याचा प्रयत्न याच संत साहित्याने केला. त्यामुळे मराठी भाषेची अस्मिता टिकवून धरणारी एकमेव संजिवक वल्ली या दृष्टिनेच शिवाजी सावंत या संत साहित्याकडे पहात होते. सावंतांना मराठी भाषेबद्दल अभिमान होता. पण हा अभिमान अंध नव्हता तर काळाला आवश्यक असणारी लवचिकता सुद्धात्यात होती.

प्रती सरकार स्थापन करुन ब्रिटिश शासनाला आव्हान देणाऱ्या क्रांतिसुर्य 'नाना पाटील' ह्यांना सुद्धा महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांच्या बद्दल अतिशय आदर होता. हा आदर त्यांनी आपल्या उक्तीतून आणि कृतीतून वेळोवेळी व्यक्त केला होता. भारतीय लोक सभेचे सदस्य असताना सुद्धा त्यांनी संसदे मधील प्रत्येक भाषण मराठी ह्या आपल्या मातृभाषेतच केले होते. शिवाजी सावंत व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या मध्ये स्वभाषाभिमान हा समान धागा होता. साहजिकच सावंत नाना पाटीलांच्या व्यक्तिमत्त्वाकडे आकर्षिले गेले असावेत. याच आकर्षणातून सावंतांनी नाना पाटीलांच्या संपूर्ण भाषणाचे संपादन करुन पुस्तक रुपाने प्रकाशित केले.

शिवाजी सावंतांना 'शौर्य, सामर्थ्य व स्वातंत्र्य' या विषयी नितांत आदर होता. ज्यांच्या ठायी असा गुण समुच्याय दिसला. त्या त्या विभूती समोर ते नतमस्तक होत असत क्रांतिसिंह नाना पाटील ही विभूती अशीच असामान्य होती. त्यांची गावरान मराठी बोली 'शिवाजी सावंतांना' भावली होती. तिचा मन:पूर्वक गौरव करण्यासाठी त्यांनी हे पुस्तक लिहिले. गावरान मराठी बोलीतील सौंदर्याचे बारकावे व विभ्रम या पुस्तकातून वाचकांना आस्वादता येतात.

समाजातील थोर आदर्शांच्या भोवती मधमाशी प्रमाणे घोगांवणाऱ्या शिवाजी सावंतांच्या लेखणीने क्रांतीसिंहाची गावरान बोली या पुस्तकाच्या रुपाने स्वभाषाभिमानाचा एक आदर्शच वाचकांच्या समोर उभा केला आहे.

## ७) गीत –

### अ) श्री. साई गीते –

लष्करी अधिकाऱ्याचा करारीपणा चेहऱ्यावर असणाऱ्या शिवाजी सावंतांचा स्वभाव अत्यंत श्रद्धाळू होता. श्रद्धेचा हा वारसा त्यांना आपल्या स्वर्गीय मातोश्री राधाबाई सावंत यांच्या कडून लाभला. तसेच 'आजरा' या जन्म गावी देखील सवंतांच्या बाबतीत काही घटना घडल्या की त्यामुळे त्यांच्या स्वभावातील श्रद्धाळू पणात भरच पडत गेली. मात्र या श्रद्धेला त्यांनी कधी सुद्धा अंधश्रद्धेचा स्पर्श होऊ दिला नाही. तर तर्काच्या कसोटीवर उतरणाऱ्या देवावरच त्यांनी श्रद्धा ठेवली. शिवाजी सावत आपल्या प्रत्येक चांगल्या कृतीच्या अगोदर सुर्य देवाची आठवण करीत कारण ते तेजाचे पुजक होते. या शिवाय कुळ दैवत 'श्री रवळनाथ', कोल्हापूरची श्री महालक्ष्मी आणि आजऱ्याचेच 'संत मोरजे महाराजांची समाधी' ही सावंतांची विशेष श्रद्धा स्थाने होती.

संत साहित्या बद्दल नितांत आदर असणाऱ्या शिवाजी सावंतांना समाजाच्या हितासाठी अहोरात्र झिजणाऱ्या संता बद्दल सुद्धा निश्चितच आदर असणार आणि 'साई बाबा' हे तर 'श्रद्धा आणि सबूरी' यांचा संदेश देत जात, धर्माच्या सर्व सीमा पार केलेले एक संत होते.

साहजिकच भावशील असणाऱ्या शिवाजी सावंतांचे मन श्री साई बाबांच्या व्यक्तिमत्त्वाकडे आकर्षिले गेले आणि याच आकर्षणातून त्यांनी साई बाबांच्या बद्दलच्या भावना पद्य रुपात उतरविलेल्या दिसतात.

शिवाजी सावंतांनी अन्य काव्यनिर्मिती केली नाही पण काव्यनिर्मितीला अनुरुप त्यांची प्रतिभा होती. त्यांची उत्कृष्ट भाषाशैली या वैशिष्ट्याची द्योतक आहे. सावंतांनी आपल्या मातोश्रीच्या मृत्यू संदर्भातील काव्य ओळी लिहिल्या आणि शिर्डीच्या साई बाबांवर गीते लिहिली. त्यातून त्यांची श्रद्धा निष्ठा आणि भावशिलता दिसून येते.

# शिवाजी सावंत यांना लाभलेले साहित्य पुरस्कार

शिवाजी सावंत यांना मराठी साहित्य विश्वामध्ये दिलेल्या योगदानासाठी अनेक पुरस्कार प्राप्त झालेले असून त्यांची माहिती पुढील प्रमाणे

१) मृत्युंजय -

१) भारतीय ज्ञानपीठ नवी दिल्ली, मूर्तिदेवी पुरस्कार - १९९५

२) पूनमचंद भुतोडिया बंगाली पुरस्कार, ताम्रपटासह रु. १०,०००/- १९८६

३) महाराष्ट्र राज्य पुरस्कार - १९६७

४) न.चि. केळकर पुरस्कार - १९७२

५) 'ललित' मासिक पुरस्कार - १९७३

६) गुजराती भाषांतराला साहित्य आकादमी पुरस्कार - १९९०

७) गुजराती भाषांतराला केंद्रीय आकादमी पुरस्कार - १९९२

८) फाय फाऊंडेशन पुरस्कार, इचलकरंजी - १९९६

९) आचार्य अत्रे विनोद विद्यापीठ पुरस्कार - १९९८

२) छावा -

१) महाराष्ट्र राज्य शासन उत्कृष्ट वाङमय पुरस्कार - १९८०

२) धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठान, बढू बुद्रुक पुरस्कार

३) लढत -

१) रत्नाप्पा कुंभार प्रतिष्ठान पुरस्कार, कोल्हापूर

# शिवाजी सावंत यांना लाभलेले साहित्यिक सन्मान

शिवाजी सावंत यांना आपल्या वाङमयीन कारकीर्दीमध्ये अनेक पुरस्कारांन व्यतिरिक्त अनेक साहित्यिक सन्मान सुद्धा प्राप्त झाले असून त्यांची नावे पुढील प्रमाणे

१) अध्यक्ष - बडोदे मराठी साहित्य संमेलन, बडोदा, गुजरात - १९८३

२) उद्घाटक - विदर्भ साहित्य संमेलन, दर्यापूर - १९९६ (४० वे)

३) उद्घाटक - दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन, बेळगाव - १९८६

४) अध्यक्ष - महाराष्ट्र कामगार साहित्य संमेलन (७वे)कोल्हापूर - १९९८

५) उपाध्यक्ष - महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे - १९९५ ते १९९८

६) पुणे महानगर पालिका सन्मानपत्र - १९९७

७) नवोदित साहित्य संमेलन - अध्यक्ष १९९७

८) पुणे विद्यापीठ जीवन गौरव पुरस्कार - १९९९

९) कोल्हापूर भूषण - पुरस्कार - २०००

१०) 'विश्वभूषण' मराठी पुरस्कार २००० अखिल भारतीय मराठा सेवा संघ व्दारा (अहमदनगर)

११) भारत सरकारच्या 'मानव संसाधन व सांस्कृतिक कार्यलय', नवी दिल्ली यांजकडून जेष्ठ साहित्यिक शिष्यवृत्ती.

१२) अध्यक्ष - नागेवाडी, शिवणी विटा इ. प्रादेशिक साहित्यिक संमेलन १९८५ ते १९९०

१३) 'भारतीय ज्ञानपीठाव्दारे' विद्याभवन मुंबई येथे भरविण्यात आलेल्या 'अखिल भारतीय भाषा - परिसंवाद' मराठी सदस्य म्हणून सहभाग - १९८५

१४) अध्यक्ष - पेडणे साहित्य संमेलन (गोवा) १९८९

## शिवाजी सावंत यांचा जीवनपट

'मृत्युजंय'कार शिवाजी सावंत यांच्या जीवनाचा धावता आढावा पुढील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| ३१ ऑगस्ट | १९४० - | जन्म, आजरा जि. कोल्हापूर |
| २१ नोव्हेंबर | १९४९ - | वडिलांचे निधन |
| | १९५४ - | कुमार भवन मधून प्राथमिक शिक्षण पूर्ण, आजरा |
| | १९५५ - | वि. वा शिरवाडकरांच्या अंगराजकर्ण नाटकात श्रीकृष्णाचे काम केले. |
| | १९५८ - | व्यकंटराव प्रशाला माध्यमिक शिक्षण, प्रथम वर्गात पूर्ण आजरा |
| | १९५९ - | शॉर्ट हॅन्ड व टंकलेखन डिप्लोमा पूर्ण, कोल्हापूर |
| | १९६० - | कर्णावरचे वाचन, लेखन सुरु. |
| | १९६२ - | वरिष्ठ जिल्हा सत्र न्यायालयात नोकरी, कोल्हापूर. |
| | १९६२ - | राजाराम प्रशाला मध्ये अध्यापक, कोल्हापूर |
| | १९६३ - | एफ. वाय. बी.ए. उत्तीर्ण, पुणे विद्यापीठ विषय - हिंदी |
| | १९६६ - | कुरुक्षेत्राचा प्रवास |
| | १९६७ - | 'मृत्युंजय' लिहून पूर्ण, ग.दि. माडगूळकरांच्या हस्ते पूजन (गणेश चतुर्थी) |
| ८ जून | १९६९ - | कुंदा कामतेकरांशी लग्न, कोल्हापूर |
| २२ एप्रिल | १९७० - | कन्या - कादंबिनीचा जन्म. |
| | १९७० - | युगंधरसाठी वाचन, चिंतन सुरु. |
| १२ जानेवारी | १९७२ - | पुत्र अमिताभचा जन्म |
| | १९७२ - | 'छावा' कादंबरीच्या लेखनास, प्रारंभ |
| | १९७४ - | अध्यापक पदाचा राजीनामा, लोकशिक्षण चे संपादक पुणे |
| १९ डिसेंबर | १९७६ - | चंद्रलेखा मार्फत 'मृत्युंजय' नाटक रंगभूमीवर सादर |

| | | |
|---|---|---|
| २२ जानेवारी | १९७६ - | मातोश्री राधाबाई चे निधन |
| | १९७८ - | स्कूटर अपघात, 'छावा' चे लेखन पूर्ण नंतर जसलोक हॉस्पीटल मध्ये दाखल. |
| | १९७९ - | 'छावा' चे प्रकाशन, यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते. |
| | १९८३ - | 'लोकशिक्षण' च्या संपादक पदावरुन स्वेच्छा निवृत्ती |
| १ मे | १९८३ - | चंद्रलेखा मार्फत 'छावा' नाटक सादर |
| | १९८६ - | शंकरराव चव्हाण हस्ते व्दिखंडात्मक चरितकहाणी 'लढत' चे प्रकाशन |
| | १९९० - | व्दारका, मधुरा प्रवास |
| | १९९० - | 'युगंधर' च्या लेखनास प्रारंभ |
| | १९९० - | भांडारकर रिसर्च इंन्सिट्यूटचे आजीव सभासद |
| | १९९३ - | सौ. कादंबिनीचा विवाह साध्या पद्धतीने, |
| | १९९३ - | किल्लारी भूकंपग्रस्तांसाठी ५०,०००/- ची मदत |
| ६ फेब्रुवारी | १९९६ - | दिल्ली येथे मूर्तिदेवी पुरस्कार प्रदान |
| | १९९७ - | शेलकासाज, युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन प्रसिध्द |
| | १९९८ - | कांचनगण, मोरावळा प्रसिध्द |
| मार्च | १९९९ - | 'युगंधर' लिहून पूर्ण |
| २५ जुलै | २००० - | 'युगंधर' चे पूजन स्वामी अकामानंद महाराजांच्या हस्ते |
| ३१ ऑगस्ट | २००० - | एकसष्टाव्या वर्षात पदार्पण |
| | २००२ - | कराड ७६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडीसाठी अर्ज दाखल. |
| | २००२ - | अनंतात विलीन. |

# शिवाजी सावंतांची साहित्यिक वाटचाल

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | 'मृत्युजंय' | - | (पौराणिक कादंबरी) | - | १९६७ |
| २) | छावा | - | (ऐतिहासिक कादंबरी) | - | १९७९ |
| ३) | युगंधर | - | (पौराणिक कादंबरी) | - | २००० |
| ४) | मृत्युंजय | - | (नाटक) | - | १९७५ |
| ५) | छावा | - | (नाटक) | - | १९८३ |
| ६) | अशी मने, अशी नमूने | - | (व्याक्तिचित्र) | - | १९७५ |
| ७) | लढत - भाग १ व २ | - | (चरित्र कहाणी) | - | १९९५ |
| ८) | संघर्ष | - | (चरित्र कहाणी) | - | १९९५ |
| ९) | शेलकासाज | - | (ललित लेख) | - | १९९७ |
| १०) | युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन | | | - | १९९७ |
| ११) | मोरावळा | - | (व्याक्तिचित्र) | - | १९९८ |
| १२) | कांचनकण | - | (ललित लेख) | - | १९९८ |
| १३) | क्रांतिसिहाची गावरान बोली | | | | |
| १४) | श्री साई गीते | - | | | |

## संदर्भ


१) 'मृत्युजंय' कार शिवाजी सावंत व्यक्ति आणि साहित्य : संपादक : शांताराम वाघ
प्रकाशक - शशीदीप प्रकाशन, पुणे
आवृत्ती प्रथमा १ जानेवारी २००१
पृ. १२८

२) तत्रैव : पृ. १२९

३) युगंधर साहित्यिक : संपादक - जयराम देसाई
प्रकाशक - कमळाई प्रकाशन, पुणे
प्रथमावृत्ती - ३० डिसेंबर २००२
पृ. १४१

४) तत्रैव : पृ. १८१

५) तत्रैव : पृ. १६

६) 'मृत्युंजय' कार शिवाजी सावंत व्यक्ति आणि साहित्य : संपादक शांताराम वाघ.
प्रकाशक : शशीदीप प्रकाशन, पुणे
प्रथमाकृती - १ जानेवारी २००१
पृ. ११७

७) युगंधर साहित्यिक : संपादक जयराम देसाई
प्रकाशक : कमळाई प्रकाशन, पुणे
आवृती - प्रथम ३० डिसेंबर ०२
पृ. १३५

८) 'मृत्युंजय' कार शिवाजी सावंत व्यक्ति आणि साहित्य : संपादक शांताराम वाघ.
प्रकाशक : शशीदीप प्रकाशन, पुणे
आवृत्ती - प्रथम १ जानेवारी २००१
पृ. ५७

९) तत्रैव : पृ. ९०

१०) तत्रैव : पृ. १०३

११) युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन : लेखक : शिवाजी सावंत
प्रकाशक - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
प्रथमावृत्ती - फेब्रुवारी १९९७,
प्रस्तावना.